दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २११ । शुक्रवार १५ मे २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## आत्मसाक्षात्काराची गरज



'सहजयोग'
भाग ५२

जेव्हा आपल्याला हे समजेल की आपल्यामध्ये आत्मा आहे, तेव्हाच आपण परमात्म्याला ओळखू शकाल. आत्म्याला जाणल्याशिवाय आपण परमात्म्याला कधीही ओळखू शकत नाही. जोपर्यंत तुमचे डोळे उघडत नाहीत, जोपर्यंत तुमचा आत्मा हे पाहू शकत नाही, तोपर्यंत तुम्ही परमात्म्याला प्राप्त करू शकत नाही. म्हणून, सर्वात पहिले काम म्हणजे 'आत्मसाक्षात्कार' मिळवणे. त्याची संपूर्ण व्यवस्था परमात्म्याने आपल्या आत आधीच करून ठेवली आहे, त्यासाठी आपल्याला वेगळे कष्ट करण्याची मुळीच गरज नाही.शेवटी, आपण जो हा श्वास घेत आहोत त्यासाठी आपल्याला काही मेहनत करावी लागते का? किंवा आपले हृदय जे दर मिनिटाला धडधडत आहे आणि प्रत्येक प्रकारे आपल्याला मदत करत आहे, त्यासाठी आपल्याला काही कष्ट करावे लागतात का? जर परमात्म्याला प्राप्त करणे आणि आत्मदर्शन होणे मनुष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, तर ते सहजपणे व्हायलाच हवे आणि ते होणारच, त्याला सहजच व्हावे लागेल.पण आजकालची जनता आणि आजकालचे तरुण, त्यांचा तर आता परमात्म्यावरून विश्वासच उडाला आहे; परंतु त्याचे कारण असे आहे की, ज्या प्रकारे अंध लोकांनी अंधपणे परमात्म्याला जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तो पाहून हे लोक (तरुण) विचार करतात कारण ते बुद्धिवादी आहेत. ते पाहतात की कशा प्रकारे परमात्मा आणि आत्मा वगैरे काही नाहीये, ही तर निव्वळ फसवणूक आहे; हे तर केवळ फालतू लोकांचे खिसे भरण्याचे साधन आहे. असे अनेक लोक आहेत जे काही कामधंदा करत नाहीत, त्यांच्यासाठी हा पैसा कमावण्याचा एक चांगला बहाणा आणि एक व्यवसाय बनला आहे. बुद्धीने परमात्मा ओळखता येणार नाही. १६/०१/१९७९ बोरिवली

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना खुल्या जागांवर संधी नाही

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय : केंद्र सरकार, गुजरात पाठोपाठ महाराष्ट्राचे आरक्षण धोरण निश्चित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** सरकारी नोकरीत आरक्षणाचा लाभ घेतलेल्या उम ेदवारांना आता खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही. तसा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. केंद्र सरकार आणि गुजरात राज्याप्रमाणे आता म हाराष्ट्र सरकारनेही आरक्षणाचे धोरण निश्चित केले आहे.

वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधीची सवलत




घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती आता राखीव प्रवर्गातच होणार आहे. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील जागेवर दावा सांगता येणार नाही. मात्र राखीव प्रवर्गातून अर्ज आणि शुल्क भरलं असेल आणि कुठल्याही राखीव प्रवर्गाचा लाभ घेतला नसेल तर खुल्या प्रवर्गातून नियुक्ती होईल.

या आधी आरक्षणाच्या संबंधित स्पष्ट धोरण नसल्याने हा विषय अनेकवेळा सर्वोच्च न्यायालयात गेला होता. त्यामुळे राज्य सरकारने केंद्राच्या आणि गुजरातच्या धर्तीवर असा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

महाराष्ट्रात सरकारी नोकऱ्यांम धील आरक्षण धोरण हे उभे आरक्षण आणि आडवे आरक्षण अशा दोन स्तरांवर लागू होते. २०२४ मध्ये म राठा समाजासाठी स्वतंत्र सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग (एसइबीसी) प्रवर्गांतर्गत १०% आरक्षणाचा कायदा करण्यात आला असून, त्यानुसार राज्यातील एकूण उभे आरक्षण वाढले आहे.

काही भरती प्रक्रियांमध्ये जिल्हानिहाय किंवा न्यायालयीन आदेशांनुसार अंमलबजावणीत बदल असू शकतात, त्यामुळे अंतिम आकडे संबंधित जाहिरात आणि शासन निर्णयानुसार तपासणे आवश्यक असते.

**महाराष्ट्रातील एकूण आरक्षण :**
**६२ टक्के व इडब्ल्यूएस स्वतंत्र १० टक्के**

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती (एससी) | – १३% |
| अनुसूचित जमाती (एसटी) | – ७% |
| विमुक्त जाती ( व्हीजे– ए) | – ३% |
| भटक्या जमाती (एनटी–बी) | –२.५% |
| भटक्या जमाती (एनटी –सी) (धनगर) | – ३.५% |
| भटक्या जमाती (एनटी–डी) (वंजारी) | – २% |
| विशेष मागास प्रवर्ग (एसबीसी) | – २% |
| इतर मागासवर्गीय (ओबीसी) | – १९% |
| एसइबीसी (मराठा समाज) | – १०% |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (इडब्ल्यूएस) | –१०% |

इडब्ल्यूएस हे स्वतंत्र आर्थिक निकषांवर आधारित आरक्षण असून, ते गैर–आरक्षित पात्र उमेदवारांसाठी लागू होते.

# २३ मे रोजी शिर्डीत होणार संरक्षण उत्पादन संकुलांचे उद्घाटन

### संरक्षणमंत्री राजनाथसिंह उपस्थित राहणार : विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत आणि 'मेक इन इंडीया' या भारताच्या दूरदर्शी संकल्पनांना चालना देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या नेतृत्वाखाली शिर्डी औद्योगिक वसाहती मध्ये ऐतिहासिक संरक्षण उत्पादन संकुलांचे उद्घाटन संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या उपस्थितीत दि.२३ मे २०२६ रोजी होणार असल्याची माहीती जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि निबे गृपचे गणेश निबे यांनी दिली.

शिर्डी औद्योगिक वसाहती मध्ये निबे गृपच्या माध्यमातून भारतातील खासगी



क्षेत्रातील संरक्षण उत्पादनाच्या प्रवासातील एक महत्वाचा टप्पा ठरणार असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की,अत्यावश्यक संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रांसाठी प्रगत उत्पादन क्षम ता निर्माण करण्याच्या उद्देशाने शिर्डी येथील डिफेन्स क्लस्टर निर्माण होत आहे. शिर्डीची भूमी भक्ती आणि शक्तीचा अद्वितीय संगम आहे.श्री साईबाबांचा श्रध्दा आणि सबुरीचा संदेश आणि दुसरीकडे विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अहील्यानगर जिल्हा संरक्षण उत्पादनाचे म हत्वपूर्ण केंद्र म्हणून उदयास येत असल्याचे स्पष्ट करून, कार्यान्वित होणाऱ्या प्रकल्पातून तीन हजार रोजगार निर्मिती होईल. यासाठी शिर्डीची निवड केल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

शिर्डी येथील प्रकल्पातील बॉम्ब शेलच्या प्रकल्पाचे उद्घाटन आणि बायो सीएनजी प्रकल्पाचे भूमीपूजन संरक्षण **(पान ४ वर)**

## सप्ताहाचा हिशोब मागितला...

# कीर्तनकार आनंदे महाराजांना रॉड, केबलने मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** गेवराई गावातील काही व्यक्तींनी कीर्तनकार कैलास आनंदे यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. लोखंडी रॉड, केबल वायर आणि लाकडी दांड्यांनी करण्यात आलेल्या या मारहाणीचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत



कैद झाला असून परिसरात खळबळ उडाली आहे. महाराजांनी अखंड हरिनाम सप्ताहाचा हिशोब मागितल्याने त्यांच्यावर हा हल्ला केल्याचे बोलले जात आहे.

कीर्तनकार कैलास आनंदे हे स्वानंद सेवा गुरुकुल चालवतात. गावातील अखंड हरिनाम सप्ताहाचा हिशोब विचारल्याच्या कारणावरून काही व्यक्तींशी त्यांचा वाद झाला होता. याच वादातून आरोपींनी त्यांना आळंदीला जात असताना जातेगाव रोडवर अडवून त्यांना बेदम मारहाण केली. अखंड हरिनाम सप्ताहासाठी जमा झालेल्या निधीचा हिशोब मागितल्यामुळे हा वाद निर्माण झाल्याचं सांगितलं जात आहे. या वादाचे रूपांतर थेट हल्ल्यात झाल्याने धार्मिक आणि सामाजिक वर्तुळात संताप व्यक्त केला जात आहे. मारहाणीत कैलास आनंदे हे गंभीर जखमी झाले असून **(पान ४ वर)**

# देशात महागाईचा महा–विस्फोट!

### एप्रिलमध्ये घाऊक महागाई ८.३० टक्क्यांवर; ४२ महिन्यांचा रेकॉर्ड मोडला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** देशात महागाईचा दबाव आता अत्यंत वेगाने वाढत असल्याचे चिंताजनक चित्र समोर आले आहे. एप्रिल २०१६ मध्ये देशाचा घाऊक महागाई दर वाढून थेट ८.३० टक्क्यांवर पोहोचला आहे. मार्च महिन्यात हा दर ३.८८ टक्के इतका होता. अवघ्या महिनाभरात झालेली ही वाढ गेल्या ४२ महिन्यांचा म्हणजेच साडेतीन वर्षांचा विक्रम मोडणारी ठरली आहे. पेट्रोल, डिझेल, एलपीजी आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली प्रचंड वाढ हे या महागाईमागचे मुख्य कारण मानले जात आहे.

महागाईच्या वाढीमध्ये 'फ्यूल आणि पॉवर' क्षेत्राचे योगदान सर्वाधिक राहिले आहे. मार्चमध्ये केवळ १.०५ टक्क्यांवर असलेली या क्षेत्रातील महागाई एप्रिलमध्ये थेट २४.७१ टक्क्यांवर झेपावली आहे. पेट्रोल ३२.४० टक्के, डिझेल २५.१९ टक्के तर एलपीजी १०.९२ टक्के वाढ नोंदविली गेली. यामुळे वाहतूक खर्च वाढून भविष्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किम ती आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खाडी देशांमधील वाढत्या तणावामुळे



आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी उसळी आली आहे. कच्च्या तेलाची घाऊक महागाई एप्रिलमध्ये तब्बल ८८ टक्क्यांच्या पुढे नोंदवली गेली आहे. याचा थेट परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत असून प्राथमिक वस्तूंची महागाई मार्चमधील ६.३६ टक्क्यांवरून वाढून ९.१७ टक्क्यांवर पोहोचली आहे. तसेच उत्पादित वस्तूंच्या महागाईतही ४.६२ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

भीषण महागाईच्या काळात केवळ अन्नधान्य क्षेत्राकडून थोडा दिलासा मिळाला आहे. अन्नधान्याची महागाई मार्चमधील १.८५ टक्क्यांवरून वाढून २.३१ टक्के इतकीच राहिली आहे. विशेषतः घाऊक बाजारात कांदा आणि बटाट्याचे दर गेल्या वर्षीच्या तुलनेत अद्यापही कमी असल्याने सर्वसामान्यांच्या ताटातील महागाई नियंत्रणात असल्याचे दिसत आहे.

'कोअर डब्ल्यूपीआय' (अन्न आणि इंधन वगळून) ५ टक्क्यांवर पोहोचला आहे, जो ४३ महिन्यांचा उच्चांक आहे. आता मे महिन्यातील महागाईची आकडेवारी १५ जून रोजी प्रसिद्ध केली जाईल, ज्यावर संपूर्ण देशाचे लक्ष लागून आहे.

## महत्त्वाचे..

### एचएसआरपी नंबरप्लेट नसल्यास १ जुलैपासून हजारांचा दंड

मुंबई : राज्यातील वाहन सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी तसेच वाहनांची ओळख अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना १ जुलै पासून उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) प्लेट बसविणे अनिवार्य केले आहे. यासाठी यापूर्वी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र राज्यातील एचएसआरपी बसविण्याच्या कामाचा आढावा घेतल्यानंतर वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी आता ही मुदत ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, 'वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट्स आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी एचएसआरपी ही अत्यंत महत्त्वाची यंत्रणा आहे. केंद्र शासनाच्या म ार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात जुन्या वाहनांनाही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी मुदतवाढीचा लाभ घेत वेळेत एचएसआरपी बसवून घ्यावी.

# उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे निलंबित

### तबब्ल १४३ वेळा कॉल, अशोक खरातच्या पत्नीच्या नावे गुंतवणूक भोवली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** अशोक खरात प्रकरणात राजकीय नेत्यांनंतर आता प्रशासकीय अधिकारीही अडचणीत आले. अशोक खरातसोबत आर्थिक व्यवहार असल्याचा आरोप असलेल्या उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे यांना निलंबित करण्यात आले आहे.



त्यांनी अशोक खरात यांच्यासोबत १४३ वेळा फोन कॉलवर बोलणे केल्याचे समोर आले आहे. शिवाय अशोक खरात यांच्या पत्नी कल्पना यांच्या नावे अभिजीत भांडे यांनी गुंतवणूक केल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभिजित भांडेच्या निलंबनाचे आदेश दिले.

अशोक खरातने अभिजीत भांडेला ८३ वेळा कॉल केले आहेत. तर भांडेने खरातला ६० वेळा कॉल केले आहेत. ४ एप्रिल २०२५ ते १५ मार्च २०२६ या दरम्यान, अभिजीत भांडे आणि अशोक खरात यांच्याम ध्ये हे कॉल झाल्याची माहिती आहे. या दोघांच्या दरम्यान १०,०३७ सेकंद म्हणजे जवळपास ३ तास कॉल झाले. ७ ऑगस्ट २०२५ रोजी या दोघांच्या दरम्यान ११ मिनिटे चर्चा झाली होती. तर ७ जुलै २०२५ रोजी, एकाच दिवसात १० कॉल तर २३ नोव्हेंबर २०२५ रोजी १४ वेळा कॉल झाल्याचे रेकॉर्ड समोर आले.

# महाराष्ट्रासह १६ राज्ये, ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'एसआयआर'ची घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** भारत निवडणूक आयोगानं एसआयआरचा तिसरा टप्पा जारी केला आहे. या तिसऱ्या टप्प्यात १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्राचा देखील समावेश आहे. म हाराष्ट्रात एसआयआरची प्रक्रिया २० जूनपासून सुरु होईल ती प्रक्रिया ७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर पूर्ण होणार आहे.एसआयआरचा तिसरा टप्पा २० मे पासून सुरु होईल आणि तिसरा टप्पा २३ डिसेंबरल २०२६ ला संपणार आहे. आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरियाणा, झारखंड, कर्नाटक, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, ओडिशा, पंजाब, सिक्कीम, त्रिपुरा, तेलंगाणा, उत्तराखंड या राज्यांमध्ये तिसऱ्या टप्प्यातील एसआयआर होणार आहे. नवी दिल्ली, चंदीगड आणि दादरा नगर हवेली आणि दीव दमण या केंद्रशासित प्रदेशात एसआयआर प्रक्रिया राबवली जाणार आहे. भारत निवडणूक **(पान ४ वर)**

**महाराष्ट्र एसआयआर आकडेवारी**
**बीएलओची संख्या : ९७९२४**
**बीएलएची संख्या : ९६९४९**
**मतदार संख्या : ९,८६,६४,४१३**

# गर्भलिंग निदान रॅकेटचा विस्तार पुण्यापर्यंत!

**दोन डॉक्टरांसह तिघांना अटक**

**बेकायदेशीर सोनोग्राफी मशीन जप्त**

**आतापर्यंत १६ आरोपी जाळ्यात**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** बेकायदेशीर गर्भलिंग निदान आणि गर्भपात प्रकरणात श्रीराम पूर पोलिसांच्या तपासाला मोठे यश मिळाले असून, या रॅकेटचे धागेदोरे थेट पुण्यापर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात पुण्यातील दोन डॉक्टर आणि एका एजंटला अटक करण्यात आली असून, दोन बेकायदेशीर सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आली आहेत.

श्रीरामपूरातील वॉर्ड क्रमांक २



मधील होमगार्डचे माजी समावेशक डॉ. राज अजीज शेख यांना अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या पथकाने अटक केल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा तपास वेगाने सुरू झाला. तपासादरम्यान पोलिसांनी दोन सोनोग्राफी मशीन जप्त केली. त्यापैकी एक मशीन नेवासा येथील आरोपी डॉक्टर भणगे यांच्याकडून, तर दुसरे मशीन आरोपी रवींद्र ढगे याच्याकडून जप्त करण्यात आले.

ही दोन्ही मशीन कोणत्याही अधिकृत नोंदणीशिवाय वापरली जात होती आणि त्यांचा उपयोग बेकायदेशीर गर्भलिंग निदानासाठी केला जात असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी आरोपींकडे केलेल्या चौकशीत ही मशीन पुण्यातील दोन डॉक्टर आणि एका व्यक्तीकडून खरेदी केल्याचे उघड झाले.

यानंतर पोलिसांनी पुण्यात धाड टाकून डॉ. आकाश सुभाष मलगुंडे (शिरूर), डॉ. नीलकंठ अशोक जाधव (लोहगाव) आणि नरेंद्र साहेबराव ठाकरे (केसनंदगाव, हवेली) या तिघांना ताब्यात घेतले. त्यांना लोणी पोलीस स्टेशन येथे आणून अटक करण्यात आली. **(पान ४ वर)**

# साखर उद्योगाचा गळा घोटणारी निर्यातबंदी ?

भारत सरकारने साखर निर्यातीवर तात्काळ प्रभावाने घातलेली बंदी ही केवळ व्यापारी निर्णय म्हणून पाहता येणार नाही. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या साखर उद्योगासाठी हा धक्का गंभीर ठरू शकतो. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात, जिथे सहकाराच्या बळावर साखर कारखानदारी उभी राहिली, तिथे या निर्णयाचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने देशांतर्गत साखरेच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि इथेनॉल उत्पादनासाठी पुरेसा साठा




राखण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगितले असले, तरी त्यामागील आर्थिक आणि राजकीय परिणाम दुर्लक्षित करता येणार नाहीत.

महाराष्ट्रातील साखर उद्योग हा केवळ उद्योग नाही; तो ग्रामीण सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचा केंद्रबिंदू आहे. सहकारी साखर कारखान्यांनी गावागावात रोजगार निर्माण केला, शिक्षण संस्था उभ्या केल्या, बँका, पतसंस्था, दूध संघ, बाजार समित्या यांची साखळी निर्माण केली. अनेक भागात साखर कारखानाच स्थानिक अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार बनला. त्यामुळे साखर उद्योगातील कोणतीही अस्थिरता थेट शेतकऱ्यांच्या जीवनावर परिणाम करते.

मात्र या उद्योगाबाबत शासनाचे धोरण कायमच धरसोडीचे राहिले. कधी साखरेवर निर्यातबंदी, कधी निर्यात अनुदान, कधी स्टॉक लिमिट, तर कधी एफआरपीच्या नावाखाली दबाव अशा सतत बदलणाऱ्या धोरणांमुळे साखर उद्योगाला कधीच स्थिरता मिळाली नाही. जागतिक बाजारात भाव वाढले की सरकार निर्यात मोकळी करते; पण देशांतर्गत महागाईचा प्रश्न निर्माण झाला की लगेच बंदी घातली जाते. या धोरणामुळे कारखान्यांचे आर्थिक नियोजन कोलमडते.

यापूर्वीही केंद्र सरकारने कांदा, गहू आणि तांदळाच्या निर्यातीवर अचानक निर्बंध आणले होते. त्याचा फटका थेट शेतकऱ्यांना बसला. आता साखरेच्या बाबतीतही तसाच निर्णय घेण्यात आला आहे. ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखान्यांशी कोणतीही व्यापक चर्चा न करता घेतलेला हा निर्णय सहकार क्षेत्रासाठी धोक्याची घंटा ठरू शकतो.

सरकारच्या दाव्यानुसार, एल निनोमुळे उसाचे उत्पादन घटू शकते, त्यामुळे देशांतर्गत साखरटंचाई टाळण्यासाठी साठा राखणे गरजेचे आहे. तसेच पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी साखर उद्योगाकडे पुरेसा कच्चा माल असणे आवश्यक आहे. सरकारच्या दृष्टीने हा युक्तिवाद चुकीचा नाही. देशांतर्गत महागाई नियंत्रणात ठेवणे ही शासनाची जबाबदारीच आहे. मात्र प्रश्न असा आहे की, त्यासाठी साखर उद्योग आणि शेतकऱ्यांच्या अर्थकारणाचा बळी का द्यायचा?

साखर कारखानदारीचे अर्थकारण अत्यंत गुंतागुंतीचे आहे. कारखाने ऊस खरेदी, वाहतूक, प्रक्रिया, कामगारांचे वेतन, बँकांचे कर्ज आणि ऊर्जा खर्च या सगळ्यावर अवलंबून असतात. निर्यातीमुळे कारखान्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळते आणि त्यातून शेतकऱ्यांची एफआरपी देणे शक्य होते. निर्यात थांबल्यास साखरेचा साठा वाढेल, बाजारभाव घसरेल आणि कारखान्यांची रोकड अडचणीत येईल. परिणामी शेतकऱ्यांचे ऊसबिल थकण्याची



शक्यता वाढेल.

सहकारी साखर कारखान्यांची अवस्था आधीच बिकट आहे. अनेक कारखाने बँकांच्या कर्जाखाली दबलेले आहेत. अशात निर्यातबंदीमुळे त्यांची आर्थिक कोंडी आणखी वाढू शकते. दुसरीकडे मोठ्या खासगी साखर कंपन्यांकडे तुलनेने अधिक आर्थिक ताकद आहे. त्यामुळे सहकारी क्षेत्र कमकुवत होत जाऊन खासगीकरणाला चालना मिळेल, अशी भीती व्यक्त होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केलेला हा मुद्दा पूर्णपणे दुर्लक्षित करता येणार नाही.

मुळात साखर उद्योग हा ताळेबंदात नफा कॉलम नसलेला उद्योग म्हणून ओळखला जातो. कारण हा उद्योग केवळ आर्थिक फायद्यासाठी चालत नाही; तो सामाजिक जबाबदारीही पार पाडतो. कारखाने स्थानिक भागात रोजगार देतात, रस्ते बांधतात, शाळा– महाविद्यालये चालवतात, दुष्काळी भागात पाणी योजना उभ्या करतात. त्यामुळे सहकारी साखर उद्योगाचा ऱ्हास म्हणजे ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक संरचनेवरच घाव आहे.

आज गरज आहे ती स्थिर आणि दीर्घकालीन साखर धोरणाची. सरकारने प्रत्येक काही महिन्यांनी बदलणारे निर्णय घेण्याऐवजी शेतकरी, कारखानदार, सहकारी संस्था आणि तज्ज्ञ यांच्याशी चर्चा करून स्पष्ट धोरण आखायला हवे. साखर उत्पादन, इथेनॉल, निर्यात आणि देशांतर्गत साठा यामध्ये संतुलन साधणे आवश्यक आहे. अन्यथा एका बाजूला महागाई रोखण्याच्या प्रयत्नात दुसऱ्या बाजूला ग्रामीण अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होण्याचा धोका निर्माण होईल.

ऊस उत्पादक शेतकरी हा महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या घामावर उभी राहिलेली साखर कारखानदारी जर धोरणात्मक गोंधळामुळे संकटात आली, तर त्याचे परिणाम केवळ कारखान्यांपुरते मर्यादित राहणार नाहीत. ग्रामीण रोजगार, सहकार चळवळ आणि स्थानिक अर्थव्यवस्था या सगळ्यावर त्याचा गंभीर परिणाम होईल. म्हणूनच साखर निर्यातबंदीचा निर्णय हा केवळ बाजाराचा प्रश्न नसून ग्रामीण भारताच्या भवितव्याशी संबंधित मुद्दा आहे.

# श्रीरामपूर नगरपालिकेच्या कायदेशीर सल्लागार कमिटीचे सदस्यपदी कुणाल गलांडे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव :** श्रीरामपूर शहर नगरपालिकेच्या कायदेशीर सल्लागार कमिटीच्या सदस्य पदी हरेगाव येथील ॲडव्होकेट कुणाल नानासाहेब गलांडे यांची निवड झाली आहे त्याबद्दल सर्व ठिकाणी तालुक्यात त्यांचे अभिनंदन होत आहे हरेगाव येथे ग्रामस्थांच्या वतीने कुणाल गलांडे यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या त्यावेळी त्यांनी सांगितले की नगरपालिकेच्या कायदेशीर सर्व कामाची जबाबदारी यापुढे आमच्या कमिटीवर राहणार असून आपण सर्वांना कायदेशीर मार्गदर्शन यापुढे करणार आहोत सामाजिक बांधिलकी म्हणून योग्य व चांगला सल्ला देण्याचे काम करू.गलांडे यांच्या सत्कार प्रसंगी डॉ नंदकुमार वाघमारे नानासाहेब गलांडे विनायक वाघमारे अतुल भालेराव अमोल शिंदे राजू चव्हाण सामाजिक कार्यकर्ते हरेगाव जनहित विकास समिती अध्यक्ष सुनील शिनगारे आदि उपस्थित होते.



# कोपरगावात वीज पडून एक महिला ठार

**कोपरगाव :** तालुक्यातील कोपरगावातील धामोरी, मायगाव देवी परिसराला वादळी वार्यांसह झालेल्या पावसाने चांगलाच बुधवारी सायंकाळी तडाखा दिला. वादळी पावसात वीज पडून एक महिला ठार झाली तर, गाय व म्हशीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. वादळी वार्यामुळे घरांची पडझड झाली.वीजेचे खांब वाकले, शेड व गोठ्यांचे नुकसान झाले. या घटनेमुळे कोपरगाव तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.कोपरगाव शहर व तालुक्यामध्ये सोसाट्याचे वादळी वारे वाहिले होते. परंतु सर्वाधिक फटका धामोरी व मायगाव देवी परिसराला जबरी फटाका बसला.मायगाव देवी येथे अचानक पाऊस सुरू झाला. यावेळी मीराबाई सुरेश थोरात (वय ६२) ही महिला आपल्या शेतात काम करत असताना अचानक वीज कोसळली. यात मीराबाई थोरात यांचा जागीच मृत्यू झाला.गुरूवारी कोपरगाव येथे त्यांचे शवविच्छेदन करण्यात आले.मायगाव देवी येथीलच विश्वास कोंडाजी जाधव, सुभाष कोंडाजी जाधव यांची म्हैस वीज पडून दगावली.धामोरी येथे प्रकाश बळवंत कांबळे यांच्या घराजवळील लिंबाचे झाड वार्यामुळे पडून गाईचा मृत्यू झाला.याशिवाय सुदाम थोरात, सोमनाथ गाडे यांच्या शेडचे पत्रे उडाले आहेत.तसेच परिसरात २४ तासांपासून वीज गायब झाली होती. मायगाव देवी व परिसरात वीजेचे खांब वाकले आहेत, तारा तुटल्याने बुधवारी सायंकाळपासून वीज पुरवठा खंडीत झाला होता. बुधवारी झालेल्या वादळी वार्यात सांगवी भुसार येथील किसन कचरू पवार व गोरख कचरू पवार यांच्या घराची पडझड झाली. याशिवाय निलेश नारायण जाधव यांचे गोठ्याचे व अशोक दादा जाधव यांचे पोल्ट्रीचे नुकसान झाले आहेत. विविध गावांत झालेल्या नुकसानीची माहिती संकलीत करण्याचे काम सुरू आहे. तलाठ्यांना माहिती कळविण्याच्या सुचना दिल्या.

# छत्रपती संभाजीराजांमुळे हिंदूधर्म टिकला : विश्वनाथगिरी महाराज

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान:** हिंदू धर्म, धर्म रक्षक छत्रपती संभाजी राजांमुळे टिकला असून छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे कार्य आजच्या तरुण पिढीला प्रेरणादायी असल्याचे उद्गार ह भ प विश्वनाथ गिरी महाराज यांनी काढले. टाकळीभान बस स्थानक परिसरामध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाराज उपस्थित यांना उपदेश करताना बोलत होते. यावेळी कार्यक्रम प्रसंगी ह भ प विश्वनाथ गिरीजी महाराज ( माहीम भट आश्रम घोगरगाव ) व ह भ प कृष्ण महाराज वाघुले यांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबाफुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्याप्रतिमांचे पूजन करण्यात आले व त्यानंतर उपस्थित महाराज व गावातील मान्यवरांच्या



हस्ते छत्रपती शिवराय व छत्रपती संभाजी महाराजांची आरती संपन्न झाली. सायंकाळी पारंपारिक वाद्यासह, व बाल वारकरी विद्यार्थी, टाळकरी भजनी मंडळी यांसह छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी छत्रपती शिवराय व छत्रपती संभाजी महाराजांच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. याप्रसंगी माजी सभापती नानासाहेब पवार, सोसायटीचे चेअरमन मंजाबापू थोरात, कारेगाव भागचे संचालक शिवाजीराव शिंदे, उपसरपंच कान्हा खंडागळे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, सोसायटीचे माजी चेअरमन राहुल पटारे, व्हा. चेअरमन अविनाश लोखंडे, विलास दाभाडे, प्राचार्य जयकर मगर, ॲड प्रमोद वलटे, तंटामुक्तीचे आबासाहेब रणनवरे,बंडोपंत बोडखे, अनिल बोडखे, अक्षय कोकणे, संभाजी पटारे, रणजीत मगर,बापूसाहेब शिंदे, सुधीर मगर, मेजर राहुल तांदळे, नरेंद्र अबुज, किशोर माने, प्रताप परदेशी, विक्रांत माने, संदीप कोकणे, विलास बोडखे, मनोज मगर, गौरव चितळे, बबलू परदेशी आदीसह छत्रपती संभाजी राजे युवा प्रतिष्ठानचे सदस्य, राजमुद्रा ग्रुपचेसदस्य,वग्रामस्थउपस्थितहोते.

# २३ मे ला संरक्षणमंत्री राजनाथसिंह शिर्डीत बॉम्ब शेलच्या प्रकल्पाचे उद्घाटन करणार


प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत आणि 'मेक इन इंडीया' या भारताच्या दूरदर्शी संकल्पनांना चालना देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या नेतृत्वाखाली शिर्डी औद्योगिक वसाहती मध्ये ऐतिहासिक संरक्षण उत्पादन संकुलांचे उद्घाटन संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या उपस्थितीत दि.२३ मे २०२६ रोजी होणार असल्याची माहीती जलसंपदा तथा पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे आणि निबे गृपचे गणेश निबे यांनी दिली.

शिर्डी औद्योगिक वसाहती मध्ये निबे गृपच्या माध्यमातून भारतातील खासगी क्षेत्रातील संरक्षण उत्पादनाच्या प्रवासातील एक महत्वाचा टप्पा ठरणार असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की,अत्यावश्यक संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रांसाठी प्रगत उत्पादन क्षमता निर्माण करण्याच्या उद्देशाने शिर्डी येथील डिफेन्स क्लस्टर निर्माण होत आहे.

शिर्डीची भूमी भक्ती आणि शक्तीचा अद्वितीय संगम आहे. श्री साईबाबांचा श्रध्दा आणि सबुरीचा संदेश आणि दुसरीकडे विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अहील्यानगर जिल्हा संरक्षण उत्पादनाचे महत्वपूर्ण केंद्र म्हणून उदयास येत असल्याचे स्पष्ट करून, कार्यान्वित होणार्या प्रकल्पातून तीन हजार रोजगार निर्मिती होईल. यासाठी शिर्डीची निवड केल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

।निबे उद्योग समुहाचे गणेश निबे प्रकल्पाची माहीती देताना म्हणाले की,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत संकल्पनेतून आमच्या स्टार्टअपला मिळालेली संधी खूप मोठी आहे. शिर्डी येथील प्रकल्पात एक हाजार कोटी रुपयांची गुंतवणूक आम्ही आतापर्यत केली आहे.भविष्यात ही गुंतवणूक अधिक वाढेल.अत्याधुनिक प्रणालींचे डिझाइन, विकास, उत्पादन आणि एकत्रीकरण करणारी भारतातील आघाडीचा निबे गृप असून,शिर्डी येथील प्रकल्पातील बॉम्ब शेलच्या प्रकल्पाचे उद्घाटन आणि बायो सीएनजी प्रकल्पाचे भूमीपूजन संरक्षण मंत्री राजनाथसिंह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. शिर्डी येथील प्रकल्प राष्ट्रीय सुरक्षा अर्थिक विकास लघु सूक्ष्म उद्योगाचे सक्षमीकरण रोजागार निर्मीती आणि पर्यावरणीय जबाबदारी आशा एकात्मिक दृष्टिकोनातून कार्यान्वित होणार असून,प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमिताने देशभरातील विद्यार्थी, उदयोन्मुख अभियंते,लघु सूक्ष्म उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले उद्योजक यांना निमंत्रित करण्यात आले असल्याचे गणेश निबे यांनी सांगितले.




# पंतप्रधान मोदी यांच्या दूरदृष्टी नेतृत्वामुळे देशाची आर्थिक स्थिरता अबाधित : आ खताळ

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर:** गेल्या काही महिन्यांपासून जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या तणावपूर्ण आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक देशांना आर्थिक, व्यापारी आणि सामाजिक स्वरूपाच्या गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. विविध राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था डळमळीत होत असताना, महागाई वाढत असताना आणि परकीय चलन साठ्यावर ताण येत असताना भारत मात्र स्थिर आणि सक्षमपणे पुढे जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या यशामागे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर, निर्णायक आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा मोठा वाटा असल्याचे सर्व स्तरांतून मान्य केले जात आहे. जागतिक अस्थिरतेच्या काळातही त्यांनी घेतलेल्या योग्य आर्थिक धोरणांमुळे भारताची अर्थव्यवस्था मजबूत राहिली असून देशाची विकासगती कायम ठेवण्यात यश आले असल्याचे आमदार अमोल खताळ पाटील यांनी सांगितले



पंतप्रधान मोदी यांनी नेहमीच 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेवर भर दिला आहे. देशातील उत्पादन, उद्योग, व्यापार आणि स्थानिक बाजारपेठांना चालना देत भारताला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचे त्यांचे धोरण आज अधिक परिणाम कारक ठरत आहे. परकीय चलन देशातच टिकून राहावे, देशांतर्गत गुंतवणूक वाढावी आणि भारतीय अर्थव्यवस्था अधिक सक्षम व्हावी यासाठी त्यांनी केलेल्या आवाहनाला देशभरातून उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. भारताची आर्थिक ताकद वाढविण्या साठी प्रत्येक नागरिकाने स्वदेशी उत्पादनांना प्राधान्य देणे, अनावश्यक परकीय खर्च टाळणे व देशहिताला सर्वोच्च मानणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. देशाच्या प्रगतीत प्रत्येक भारतीयाचा सहभाग महत्त्वाचा असून राष्ट्रहितासाठी एकजुटीने उभे राहण्याची हीच योग्य वेळ असल्याचे नागरिकांचे मत आहे. जागतिक संकटांच्या पार्श्वभूमीवर भारताने स्थैर्य, आत्मविश्वास आणि विकासाचा मार्ग स्वीकारला आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरील विश्वास अधिक दृढ होत असून देशाला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.आज गरज आहे ती राष्ट्रहितासाठी ठामपणे उभे राहण्याची. त्यामुळे सर्व नागरिकांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देत आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम भारत घडविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# शनिशिंगणापूर देवस्थानने 'शनिरत्न पुरस्कार' सोहळा आयोजित करण्याची मागणी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**सोनई : श्री** या प्रसिद्ध देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष स्व. यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'शनिरत्न पुरस्कार' सोहळा यावर्षीही देवस्थानमार्फत आयोजित करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वरे प्रशासक तथा नाशिक विभागीय आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत स्व. यांच्या वारसांनी देवस्थान प्रशासनाला पत्र दिले असून, गेल्या २२ वर्षांपासून सुरू असलेली 'शनिरत्न पुरस्कार' परंपरा खंडित होऊ नये, अशी भावना व्यक्त केली आहे. निवेदनानुसार, स्व. बानकर यांनी इतर चार ग्रामस्थांच्या सहकार्याने १८ जुलै १९६३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत या देवस्थानची नोंदणी केली होती. नोंदणीपासून ७ ऑगस्ट २००३ रोजी निधन होईपर्यंत सलग ४० वर्षे त्यांनी संस्थापक अध्यक्ष म्हणून देवस्थानच्या विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनानंतर २००४ पासून त्यांच्या स्मृती जागवण्यासाठी 'शनिरत्न पुरस्कार' सुरू करण्यात आला. सुरुवातीला हा पुरस्कार पुण्यतिथीनिमित्त दिला जात होता. मात्र, गेल्या चार वर्षांपासून '' उत्सवादरम्यान हा सोहळा पार पडत आहे. धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात येते. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, वस्त्रदान तसेच २०२५ पासून ५१ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. निवेदनात स्व. बानकर यांना विविध संस्थांनी दिलेल्या सन्मानचिन्हांचाही उल्लेख करण्यात आला आहे. भारताच्या राष्ट्रपती यांच्या दौऱ्यावेळी देवस्थानच्या जनसंपर्क कार्यालयातील सन्मानचिन्हे व छायाचित्रे काढून ठेवण्यात आली होती. ती पुन्हा सन्मानाने मूळ जागी लावावीत, अशीही मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. स्व. बानकर यांचे देवस्थान उभारणीतील योगदान लक्षात घेता, २२ वर्षांची ही गौरवशाली परंपरा यावर्षीही उत्साहात साजरी व्हावी, अशी विनंती त्यांचे चिरंजीव आणि पुतणे यांनी केली आहे.

## देवस्थान प्रशासनाचे स्पष्टीकरण

**सध्या देवस्थान समिती कार्यरत नसल्याने तसेच 'शनिरत्न पुरस्कार' देण्याबाबत कोणतीही नियमावली नसल्याने यासंदर्भात सर्व तपासणी करून समिती स्थापन झाल्यानंतर स्वतंत्र शनि पुरस्कार सोहळा घेण्याबाबत विचार सुरू आहे, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी दिली.**

# वैशाख वद्य एकादशी निमित्त हजारो भाविकांनी घेतले ''पैस'' खांबाचे दर्शन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** वैशाख वद्य अपरा एकादशीच्या निमित्ताने नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज ''पैस''खांब मंदिरामध्ये हजारो भाविकांनी ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष करत माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या ''पैस'' खांबाचे दर्शन घेतले.यावेळी शेकडो दिंड्यांनी येथे मंदिर प्रांगणात टाळ मृदुंगाच्या गजरात हजेरी लावली. नेवासा पंचक्रोशीतून व तालुक्याबाहेरून आलेल्या पायी दिंडयांचे संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी स्वागत केले.संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या वैशाख वद्य अपरा एकादशीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत माऊलीच्या ''पैस''खांबास यजमानांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला.यावेळी आदिनाथ महाराज पांगरे,संतसेवक दामोदर पवार विश्वस्त मंडळी उपस्थित होते.एकादशीचे औचित्य साधून माऊलींच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी मंदिरातील विठ्ठल रुख्मिणी,संत ज्ञानेश्वर माऊली पैस खांब,भगवान दत्तात्रय,करविरेश्वर, वैकुंठवाशी गुरुवर्य बन्सी महाराज तांबे समाधी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. एकादशी निमित्त संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर परिसर गर्दीने गजबजून गेला होता.मंदिर परिसरात विविध दुकाने उभारण्यात आल्याने यात्रेचे स्वरूप परिसराला प्राप्त झाले होते.एकादशी निमित्त गंगापूर येथील श्री विठ्ठल आश्रमाचे प्रमुख गाथामूर्ती हभप रामभाऊजी महाराज राऊत यांचे किर्तन झाले.कीर्तनाला हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले.



# मक्तापुर येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील मक्तापूर गावामध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली,यावेळी जयंतीसाठी मराठा सुकाना समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती साजरी करण्यात आली.

सदर जयंती कार्यक्रमाचे अध्यक्ष मक्तापुर गावाचे तंटामुक्ती अध्यक्ष दत्ताभाऊ कांगुणे यांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना पुष्पहार घालण्यात आला. यावेळी दत्ताभाऊ कांगुणे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज एक शुर व पराक्रमी राजे होते त्यांना हिंदू धर्म रक्षक म्हणुन संबोधले जाते.कारण त्यांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी आपले प्राण दिले,प्रत्येक युवकांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा आदर्श घेतला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

यावेळी मराठा सुकाना समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे म्हणाले की रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी १९०० वर्षांपूर्वी स्वराज्य स्थापन करून,या हिंदवी स्वराज्यामध्ये माता भगिनींचे संरक्षण केले त्यांनी हिंदू धर्म संरक्षणासाठी स्वतःच्या प्राणाची आहुती दिली अशा शूरविर राजांची आपण प्रत्येक गावामध्ये जयंती साजरी केली पाहिजे.आपण सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना हृदया मध्ये घेतले पाहिजे तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज राजे यांचा आदर्श घेऊन युवकांनी माता भगिनींचे संरक्षण केले पाहिजे,आज महाराष्ट्र मध्ये स्त्रिया व चिमुकल्या मुलींवर अन्याय व अत्याच्यार घडत आहेत, महिला सुरक्षित नाही याबाबत त्यांनी खत व्यक्त केली. यावेळी उपस्थिती तंटामुक्त अध्यक्ष दत्ताभाऊ कांगुणे,सरपंच अनिल लहारे,सुरेश कोळेकर,दत्तात्रय बर्डे, अविनाश बाळासाहेब बर्डे,आजिनाथ झगरे,राहुल जामदार सुनील साळवे,अमोल भागवत,रामदास बर्डे,युवा नेते मनोज झगरे,तन्मय पांडागळे,जोयल साळवे,अमोल सातपुते,दीपक शिंदे,दीपक बर्डे,सचिन गायकवाड,पत्रकार बादल परदेशी,जेष्ठ पत्रकार आबासाहेब शिरसाठ, ग्रामसेवक दत्तात्रय गर्जे,सुनील कोळेकर,आकाश बनकर, लक्ष्मण बर्डे,प्रदीप बर्डे,तुकाराम पाटील बर्डे,संभाजी बर्डे,आजिनाथ बर्डे,अविनाश बर्डे,अंशाबापू नवघरे, नवनाथ बर्डे यांच्यासह मक्तापूर गावातील ग्रामस्थ व भीमसैनिक तसेच शिवसेनेचे कार्यकर्ते व एकलव्य संघटना कार्यकर्ते उपस्थित होते.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## पुणतांबा येथे त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**पुणतांबा** : श्री क्षेत्र पुणतांबा येथे आदिक मासानिमित्त येथील गंगागिरी महाराज आश्रमात रविवार दि. १७ मे बुधवार दि. २० मे पर्यंत त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताह व गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आश्रमाचे प्रमुख विजयानंद गिरी महाराज यांनी दिली. अखंड हरिनाम सप्ताहामध्ये हभप विश्वनाथगिरी महाराज हभप अर्जुनगिरी महाराज हभप हरी शरण गिरी महाराज यांचे सायंकाळी ७ ते ९ दरम्यान किर्तन आयोजित करण्यात आले. तसेच बुधवार दिनाक २० मे रोजी दुपारी १२ ते २ च्या दरम्यान मंहत रामगिरी महाराज यांचे काल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे. तसेच दररोज पहाटे ४ ते ६ काकडा ७ ते १२ गुरुचरित्र झारी२त्ते४ गुरुचरित्र पारायण सायंकाळी ५ते ६ हरिपाठ७ते ९ हरि किर्तन अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी ह्या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन विजयानंद गिरी महाराज यांनी केले आहे.

## केशव गोविंद विद्यालयात आदिती मेहेत्रे प्रथम



**आंबी** : श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या बेलापूर खुर्द येथील केशव गोविंद विद्यालयाची गुणवंत विद्यार्थिनी आदिती सचिन मेहेत्रे हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत आपल्या यशाचा झेंडा फडकवला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात आदितीने ८८.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल तिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या यशाबाबत बोलताना आदितीने सांगितले की, अभ्यासातील सातत्य, कठोर मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर मी हे यश संपादन करू शकले. मला शाळेतील मुख्याध्यापक काळे, माझे मार्गदर्शक वर्गशिक्षक अण्णासाहेब आरंगळे व इतर सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. केवळ शालेय शिक्षणच नव्हे, तर घरी देखील आई-वडिलांनी अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण करून दिले. विद्यालयाचे नाव पंचक्रोशीत उज्ज्वल झाले आहे.

# दुग्ध व्यवसायातील नवतंत्रज्ञान आत्मसात करून

## महिलांनी प्रक्रिया उद्योगाकडे वळावे : डॉ. विठ्ठल विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : शेतीपूरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसायाला अनन्यसाधारण महत्त्व असून बदलत्या हवामान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कौशल्याधारित दुग्ध व्यवसायाची गरज वाढली आहे. पशुसंवर्धन सखींनी केवळ दूध उत्पादनापुरते मर्यादित न राहता प्रक्रिया उद्योगातून व्यवसायवृद्धी साधावी, असे प्रतिपादन बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्राच्या पशुसंवर्धन विभागाचे प्रमुख डॉ. विठ्ठल विखे यांनी केले.



लोणी येथे आयोजित दुग्ध व्यवसाय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. विठ्ठल विखे. समवेत मान्यवर व उपस्थित पशुसखी महिला.

पायरेन्सच्या कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर, पशुसंवर्धन विभाग आणि डिजिटल ग्रीन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पशुसखी, पशुधन पर्यवेक्षक, पशुधन विकास अधिकारी आणि शेतकरी महिलांसाठी आयोजित एक दिवसीय दुग्ध व्यवसाय कार्यशाळेत ते बोलत होते.

अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर तसेच प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डॉ. विठ्ठल विखे म्हणाले की, पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून महिलांनी व्यावसायिक दृष्टिकोनातून दुग्ध व्यवसायाकडे पाहण्याची गरज आहे. कमी कष्टातून अधिक उत्पादन आणि उत्पन्न मिळवण्यासाठी दुग्ध उत्पादनातील विविध कौशल्ये व नवतंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशांत कुलकर्णी यांनी दुधाळ गाई-म्हशींचे फायदेशीर व्यवस्थापन तसेच वासरू ते गाय समग्र व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. डॉ. पराग घोंगळे यांनी पशुआहार व टोटल मिक्स राशन, तर डॉ. प्रशांत योगी यांनी पशु आयुर्वेद आणि पशु होमिओपॅथी यावर मार्गदर्शन केले. डॉ. निलेश खाडे यांनी जनावरांमधील प्रयोगशाळा तपासणी, दुग्ध व्यवसायाचे अर्थशास्त्र आणि प्रक्रिया उद्योग याविषयी माहिती दिली.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत अमृता दास यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस राहाता तालुक्यातील बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यशाळेत एकूण ६० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गृह विज्ञान विभागाच्या संज्जला लांडगे यांनी केले.

## प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्व विद्यालयातील बाल संस्कार शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्व विद्यालयात उन्हाळयाच्या सुट्टीचे औचित्य साधून राजयोगिनी सरला दिदी यांच्या प्रेरणेने व राजयोगिनी वंदना दिदी यांच्या नेतृत्वाखाली तीन दिवशीय बाल व्यक्तिमत्त्व संस्कार शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.भेंडा येथील जेष्ठ पत्रकार जलदुत सुखदेव फुलारी यांनी बालकांना प्रात्यक्षिकांद्वारे पाणी बचतीचे धडे देऊन पाण्याच्या बचती विषयी जनजागृती केली.पाण्याची बचत करणे ही काळाची गरज असून पाण्याचा वापर काटकसरीने करा असा संदेश त्यांनी यावेळी बोलतांना दिला. यावेळी बाल व्यक्तिमत्त्व संस्कार शिबिरात पाण्याची बचत काळाची गरजयाविषयावर बाल चिमुकल्यासाठी जलदुत पत्रकार सुखदेव फुलारी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या प्रमुख राजयोगिनी सरलादिदी राजयोगिनी वंदना दिदी,पत्रकार सुधीर चव्हाण,बाल व्यक्तिमत्त्व संस्कार शिबिरातील प्रशिक्षणार्थी दीपा शिरसाठ,सुनीता पवार व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी जलदूत सुखदेव फुलारी यांनी पाणी बचतीचे महत्व विषद करतांना विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत प्रश्न विचातुन त्यांना बोलते केले. पाणी आडवा,पाणी जिरवा,रेन वॉटर हार्वेस्टिंग या विषयावर राज्यभर व्याख्याने देऊन जल जागृती केल्याबद्दल सुखदेव फुलारी यांचा राजयोगिनी सरलादिदी यांच्या हस्ते भेट वस्तू,पुष्प शाल श्रीफळ व पुस्तिका भेट देऊन कार्याचा गौरव करण्यात आला.सदर शिबिरात मुलांना मोबाईल दूर ठेवण्याचा प्रयत्न करा,अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करून वेळापत्रक बनवा,मैदानी खेळ खेळण्यासाठी पुढे या असे आवाहन करण्यात आले.

## प्रसिद्ध पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल यांचे शनि दर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : प्रसिद्ध पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल यांनी अचानक काल (१४ रोजी ) दुपारी भर उन्हात दोन वाजता शिंगणापूरात दाखल होऊन शनि दर्शन घेतले शनि जयंती व शनीअमावस्या एकत्र आल्याने शनि देवाची दर्शन घेण्याची इच्छा झाली लगेचच शनिशिंगणापूर गाठले दुपारी दोन वाजता शनिशिंगणापूर दाखल होऊन अनुराधा पौडवाल यांनी १० किलो तेल अर्पण करून चौथऱ्या खालूनच दर्शन घेतले त्यानंतर शनिश्वर देवस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये देवस्थानचे कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी अनुराधा पौडवाल यांचा सन्मान केला यावेळी बोलताना त्या म्हणाले की शनि देवाची भजनी व गीते याची ध्वनिफीत तसेच सूर्यपुत्र शनिदेव हिंदी चित्रपट करण्यामागे स्वर्गीय बाबुराव बनकर भाऊ यांनी मोलाचे सहकार्य केले होते त्यांच्या प्रयत्नामुळेच आम्ही या चित्रपटाची निर्मिती करू शकलो आज शनिशिंगणापूर प्रसिद्ध येण्यामागे स्वर्गीय बानकर यांचा मोठा सिंहाचा वाटा आहे यावेळी शनिशिंगणापूरचे राज्यपाल पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील सयाराम बानकर, आदी उपस्थित होते.

## राहुरीतील राष्ट्रीय महामार्गाची प्रलंबित कामे १५ जूनपर्यंत पूर्ण करा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राहुरी नगरपरिषद हद्दीतील भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या विविध प्रलंबित कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या दालनात दि. १२ मे रोजी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत राहुरी शहरातील सर्व रखडलेली कामे दि. १५ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. बैठकीस नगरपरिषदेचे गटनेते हर्ष तनपुरे, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, मुख्याधिकारी अभिजित हराळे, नगर अभियंता पराग दराडे, प्राधिकरणाचे अधिकारी सत्यम रॉय तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार उपस्थित होते.

राहुरी नगरपरिषदेत विकास आघाडी सत्तेत आल्यानंतर माजीमंत्री प्राजक्त तनपुरे तसेच बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामे सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून ही बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत विशेषतः राहुरी शहरातील चौकोनी मोऱ्यांसंदर्भातील प्रलंबित कामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्य रस्त्यापासून शहरात येणाऱ्या मार्गांचा उतार व जोडरस्ते तयार करणे, शहरातील ओढ्यात टाकण्यात आलेली माती, दगड, विटा व डबर हटवून स्वच्छता करणे, रस्ता कामादरम्यान जमा केलेले पोल नगरपालिकेला परत करणे अथवा त्याची भरपाई देणे, तसेच मोडलेली चेंबर्स दुरुस्त करणे आदी कामांचा यात समावेश आहे.

ही सर्व कामे दि. १५ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण प्रशासनाला दिले आहेत. निर्धारित मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास १५ जूननंतर मोठे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा गटनेते हर्ष तनपुरे व उपनगराध्यक्ष गजानन सातभाई यांनी दिला आहे.

## परतीचा पाऊस धुमाकुळ घालणार : डॉ. पंजाब डख

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा** : गावराण आंब्याला जास्त प्रमाणात फुलोरा आला की त्या वर्षी पाऊसाचे प्रमाण कमी असते यंदा सरासरी पेक्षा पावसाचे प्रमाण कमी असले तरी सर्व पीकांचे उत्पादन चांगले असणार आहे. मात्र परतीचा पाऊस धुमाकुळ घालणार आहे. असा अंदाज हवामान तज्ञ डॉ. पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे. नेवासा तालुक्यातील कुकाणा - भेंडा शिवरात असलेले त्रिमूर्ती कृषी सेवा केंद्र व श्रीराम बायोसीड जेनेटिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.



कुकाणा : शेतकरी मेळाव्या प्रसंगी मार्गदर्शन करताना हवामान तज्ञ डॉ.पंजाबराव डख व मान्यवर **(छाया : सुनिल पंडित)**

यावेळी मार्केट कमिटीचे संचालक दत्तात्रय खाटीक, सेवानिवृत्त प्राचार्य आण्णासाहेब काटे, तरवडी सेवा संस्थेचे अध्यक्ष सचिन क्षिरसागार, डॉ. सुदाम खाटीक, माजी सरपंच रमेश खाटीक, प्रगतशिल शेतकरी बाळासाहेब झावरे अध्यापक इस्माईल शेख आदि मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते. कृषी केंद्राचे चालक दत्तात्रय खाटीक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डख पुढे म्हणाले की, यंदा ऊस, कापुस व तुर ही पीके चांगले येणार असुन २९ मे ला कापुस लावल्यास उत्पादन वाढणार.

योग्य नियोजन केल्यास कपाशी आणि हरभरा असे दोन पीक घेता येतात. तसेच आज ( गुरुवार) व शुक्रवार पाऊस पडणार आहे. तर २५ मे नंतर आवकळी पाऊस होईल. २०२६ मध्ये पीकासाठी योग्य वेळी चांगला पाऊस पडणार असुन पीक खुप चांगले येणार आहे मात्र परतीचा पाऊस धुमाकुळ घालणार आहे. जर दोन वर्ष चांगला पाऊस पडला तर त्यानंतर एक वर्ष पावसाचे प्रमाण कमी असते. अक्षय तृतीयाला रात्रीच्या वेळी थोडेसे थेंब पडणे किंवा ढग येणे हा चांगल्या पाऊसाचा संकेत आहे. जुन महिन्यात ५ , ६ व ७ या तारखेला चांगला पाऊस आहे असे सांगुन त्यांनी निसर्गात होणाऱ्या बदलानुसार पावसाचे प्रमाण व कधी येईल यांचा अंदाज आपणाला कळतो. यावेळी बायोसीडचे महाराष्ट्र प्रमुख भरत पोतदार यांनी ६००१ या मक्का वाण पीकावर माहिती सांगितली तर विष्णु बटुळे यांनी कपाशी पिकाबद्दल माहिती विशद केली.

या मेळाव्या प्रसंगी डॉ. नानासाहेब थोरे, प्रगतशिल शेतकरी अप्पासाहेब कावरे, बाळासाहेब खाटीक, संदिप झिरपे , संजय आढाव , प्रमोद काटे, अरुण फोलाणे, विजय खाटीक यांच्या सह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यापक इस्माईल शेख यांनी सुत्रसंचालन केले तर त्रिमूर्ती कृषी सेवा केंद्राचे संचालक बाळासाहेब खाटील यांनी आभार मानले.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे तातडीने करा : आ. खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : संगमनेर तालुक्यात बुधवारी झालेल्या अवकाळी पावसासह वादळी वाऱ्याने मोठे नुकसान झाले. लोहारे येथे वीज पडून लताबाई कैलास सोनवणे (वय ४२) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर डिग्रस येथे घराची भिंत अंगावर कोसळल्याने महादू माळी (वय ७०) या वृद्धाचा मृत्यू झाला आहे.

या दुहेरी दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, दोन्ही घटनांची माहिती मिळताच आमदार अमोल खताळ यांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधून संबंधित कुटुंबांना शासकीय मदत मिळवून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू झालेल्या दोन्ही कुटुंबांना शासनाकडून प्रत्येकी चार लाख रुपयांची आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे तालुक्यातील जनजीवन काही काळ विस्कळीत झाले होते. अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला असून शेतीपिकांसह मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त भागातील पंचनामे तात्काळ करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याची माहितीही आमदार खताळ यांनी दिली.

संगमनेर तालुक्यात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. लोहारे आणि डिग्रस येथील दुर्घटना अत्यंत दुर्दैवी असून या कुटुंबांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. संबंधित कुटुंबांना शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळावी यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू केला आहे. अशी माहिती आमदार खताळ यांनी दिली.

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील उंदिरगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी अशोक सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन सुरेश पाटील गलांडे व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य राजेंद्र पाटील पाऊलबुद्धे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी 'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा दिला आणि त्यांचे शौर्य व त्याग तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. प्रसंगी उपस्थिती: या कार्यक्रमाला रावसाहेब गुरव, राजेंद्र गिऱ्हे, जितेंद्र गोलवड, बाळासाहेब निपुंगे, भगवान ताके यांच्यासह गावातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्रामपंचायत कर्मचारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## माळवाडगावच्या कन्यांची मुंबई पोलीस दलात दमदार भरारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव गावासाठी अभिमानाची बाब ठरणारी घटना घडली असून सर्वसामान्य कुटुंबातील दोन होतकरू मुलींची मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. प्रगतशील शेतकरी बबनराव आसने यांची कन्या पल्लवी आसने आणि विजय पवार यांची कन्या पायल पवार यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. माळवाडगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या या दोन्ही मुली गावातील तरुणींसाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत. विशेष म्हणजे, माळवाडगावमधून प्रथमच महिलांची मुंबई पोलीस दलात निवड झाली असून पल्लवी आणि पायल या गावातील पहिल्याच महिला पोलीस ठरल्या आहेत. अत्यंत साध्या कुटुंबातून पुढे येत त्यांनी स्पर्धात्मक वातावरणात यश मिळवले.





त्यांच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मुलींनी शिक्षण व कष्टाच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे पल्लवी आणि पायल यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या निवडीमुळे माळवाडगावच्या नावाला नवी ओळख मिळाली असून भविष्यात अनेक मुलींना प्रेरणा मिळणार आहे.

# गौतम पब्लिक स्कूलमध्ये ५७ महाराष्ट्र बटालियन ट्रेनिंग कॅम्प

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यातील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचालित गौतम पब्लिक स्कूलमध्ये केंद्र व राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने सीएटीसी २०७/५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी वार्षिक ट्रेनिंग कॅम्प पार पडत आहे. या ट्रेनिंग कॅम्पमधील विद्यार्थ्यांसाठी संस्थेचे विश्वस्त आमदार आशुतोष काळे व सचिव सौ. चैतालीताई काळे यांच्या सूचनेनुसार सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली आहे. सोमवार (दि.११) पासून हा ट्रेनिंग कॅम्प सुरु झाला असून बुधवार (२०) रोजी या कॅम्पची सांगता होणार आहे.



अहिल्यानगर जिल्ह्यातील २८ शाळांतील इयत्ता ८ वी व ९ वी आणि १५ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी व १२ वी आणि वरिष्ठ महाविद्यालयाच्या एनसीसीच्या एकूण ४०२ विद्यार्थी या वार्षिक ट्रेनिंग कॅम्प मध्ये प्रशिक्षण घेत आहेत.

यामध्ये २६२ मुले आणि १४० मुलींचा समावेश असून गौतम पब्लिक स्कूलच्या २१ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना कॅम्प कमांडर कर्नल आशिष रैना, डेप्युटी कॅम्प कमांडर कॅप्टन अंकुश आवारे, कॅम्प सुभेदार मेजर राजेंद्र सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची टीम सहभागी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत आहेत. या ट्रेनिंग कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना व्यायाम, परेड, रायफल चालविणे प्रशिक्षण, नकाशा वाचन, जर्निंग डीस्टंन्स, फिल्ड ग्राम, हेल्थ आणि आयजीन या विषयांचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच सेंन्ट्रल लेक्चरमध्ये आगीपासून बचाव करणे, वन विभागाच्या माध्यमातून जंगलातील प्राण्यांची ओळख आणि प्राण्यांच्या हल्ल्यातील प्राथमिक उपचार प्रशिक्षण, परिवहन विभागाकडून आपत्कालीन वाहतूक नियम आणि वाहन चालवण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. देशात व राज्यात अचानक उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत किंवा नैसर्गिक आपत्तीत नागरिकांची सुरक्षा आणि बचाव करण्यासाठी या ट्रेनिंग कॅम्पचे केंद्र शासनाकडून आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कॅम्प कमांडर कर्नल आशिष रैना यांनी दिली.

देशासाठी कर्तव्य आणि जागरूकता निर्माण करण्याचे काम एनसीसीच्या माध्यमातून होत असून एनसीसीच्या विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही परिस्थितीला धैर्याने सामोरे जावून त्या परिस्थितीवर मात कशी करायची हा आत्मविश्वास या ट्रेनिंग कॅम्पच्या माध्यमातून दिला जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार असून ज्या ज्यावेळी आपत्कालीन परिस्थिती निर्माण होईल त्या त्यावेळी या विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे. घरापासून दूर आणि मोबाईलच्या विश्वापासून दूर राहून सर्वसामान्य नागरीकांशी समरस कसे व्हायचे याचे धडे या ट्रेनिंग कॅम्पच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना दिले जात आहे. त्यामुळे गौतम पब्लिक स्कूलच्या मैदानांना एकप्रकारे सैन्याच्या छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या ट्रेनिंग कॅम्पला संस्थेचे विश्वस्त आमदार आशुतोष काळे व सचिव सौ.चैतालीताई काळे या भेट देणार आहेत. प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली गौतमचे एनसीसी सिटीओ ईसाक सय्यद सीएटीसी २०७/५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी वार्षिक ट्रेनिंग कॅम्प यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

## पान १ वरुन

### २३ मे रोजी शिर्डीत होणार संरक्षण उत्पादन संकुलांचे उद्घाटन

मंत्री राजनाथसिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असल्याचे गणेश निबे यांनी सांगितले.
शिर्डी येथील प्रकल्प राष्ट्रीय सुरक्षा अर्थिक विकास लघु सूक्ष्म उद्योगाचे सक्षमीकरण रोजागार निर्मीती आणि पर्यावरणीय जबाबदारी आशा एकात्मिक दृष्टिकोनातून कार्यान्वित होणार असून, प्रकल्पाच्या उद्धाटन सोहळ्याच्या निमिताने देशभरातील विद्यार्थी, उदयोन्मुख अभियंते, लघु सूक्ष्म उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले उद्योजक यांना निमंत्रित करण्यात आले असल्याचे गणेश निबे यांनी सांगितले.
निबे उद्योग समुहाचे गणेश निबे प्रकल्पाची माहीती देताना म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत संकल्पनेतून आमच्या स्टार्टअपला मिळालेली संधी खूप मोठी आहे. शिर्डी येथील प्रकल्पात एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आम्ही आतापर्यत केली आहे.भविष्यात ही गुंतवणूक अधिक वाढेल.अत्याधुनिक प्रणालींचे डिझाइन, विकास, उत्पादन आणि एकत्रीकरण करणारी भारतातील आघाडीचा निबे गृप असून,

### कीर्तनकार आनंदे महाराजांना रॉड, केबलने मारहाण

त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर आनंदे कुटुंबीय दहशतीत आहेत. राज्याच्या पोलीस महासंचालकांनी आणि बीड पोलिस अधीक्षकांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मुख्य आरोपी तंटामुक्ती समितीचा अध्यक्ष- या हल्ल्याचे सर्व चित्रण सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. फुटेजच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला असून संबंधित आरोपींविरुद्ध कठोर कारवाईची मागणी होत आहे. मारहाणीदरम्यान हल्लेखोरांनी 'याचा संतोष देशमुख करून टाका' असं म्हटल्याचा दावा जखमी कैलास आनंदे यांनी केला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी हा गावातील तंटामुक्ती समितीचा अध्यक्ष असल्याची माहिती आनंदे यांनी दिली.

### गर्भलिंग निदान रॅकेटचा विस्तार पुण्यापर्यंत!

गुरुवारी राहाता न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, या प्रकरणात आतापर्यंत एकूण १६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये पाच डॉक्टर, चार एजंट तसेच संबंधित गर्भवती महिलांच्या सहा कुटुंबीयांचा समावेश आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे पुढील तपास करत आहेत.

### महाराष्ट्रासह १६ राज्ये, ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'एसआयआर'ची घोषणा

आयोगानं एसआयआर प्रक्रिया मतदार यादी अचूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. एसआयआरच्या तिसऱ्या टप्प्यात ३.९४ लाख बूथ लेव्हल ऑफिसर्स घरोघरी भेटी देऊन ३६.७३ कोटी मतदारांची माहिती घेतील. यासाठी त्यांना मदत करण्यासाठी ३.४२ लाख बूथ लेव्हल एजंट मदत करतील, ज्यांची नियुक्ती राजकीय पक्षांकडून करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील वेळापत्रक एसआयआरसाठी पात्रतेची तारीख : १ ऑक्टोबर २०२६ एसआयआर तयारी, प्रशिक्षण आणि छपाई : २० जून २०२६ ते २९ जून २०२६ बीएलओ मार्फत घरभेटी : ३० जून ते २९ जुलै २०२६ मतदान केंद्रांचं सुसुत्रीकरण : २९ जुलै २०२६ मसूदा मतदार यादीची छपाई : ५ ऑगस्ट २०२६ दावे आणि आक्षेप यासाठी मुदत :५ ऑगस्ट २०२६ ते ४ सप्टेंबर २०२६ दावे आणि आक्षेपांचा निपटारा करणे : ५ ऑगस्ट २०२६ ते ३ ऑक्टोबर २०२६ अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे : ७ ऑक्टोबर २०२६

# ग्रामीण विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या जोरावर यश संपादन करावे : खा. भुमरे

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून शिक्षणाच्या जोरावर यश संपादन करावे असे आवाहन नुकत्याच झालेल्या दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपानजी भुमरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, बांधकाम सभापती सचिन गरड, जिल्हा परिषद सदस्य राधाकिसनबापू पठाडे, नगरसेवक बाळासाहेब औताडे, जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग औटी, जिल्हा परिषद सदस्य कृष्णा गिधाने, गंगापूर पंचायत समिती उपसभापती राजेश्वर हिवाळे, पंचायत समिती सदस्य ज्ञानेश्वर निळ, युवासेना पदाधिकारी ज्योतीराम पाटील, दिलीप बनकर, संतोष माने ,कृष्णा पाटेकर यांची राहुल ढोले, आदींची




प्रमुख उपस्थिती होती.

तालुक्यातील तुर्काबाद सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य योगेश पाटेकर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने भव्य शैक्षणिक व प्रेरणादायी कार्यक्रमाने तुर्काबाद येथे साजरा करण्यात आला. गंगापूर तालुक्यातील तुर्काबाद जिल्हा परिषद सदस्य योगेश पाटेकर यांच्या वाढदिवसानिमित्त स्वराज्य भूमिपुत्र प्रतिष्ठानच्या वतीने प्रेरणादायी व शैक्षणिक कार्यक्रम तसेच सुप्रसिद्ध प्राध्यापक व वक्ते प्रा. वसंत हंकारे सर यांचे आई-बाप समजून घेताना या अत्यंत हृदयस्पर्शी विषयावर व्याख्यानात प्रभावी वक्तृत्वाने उपस्थित विद्यार्थी, पालक व नागरिक भारावून गेले. पालकांविषयी आदर, कुटुंबातील संवाद आणि विद्यार्थ्यांच्या जीवनातील संस्कारांचे महत्त्व यावर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी तुर्काबाद जिल्हा परिषद शाळा व्ही. एम. जी. पाटील इंग्लिश स्कूल, एकता पब्लिक स्कूल, हॅपी चाईल्ड इंग्लिश स्कूल वाळूज तसेच पंचक्रोशीतील शाळांमधील विद्यार्थी, पालक वर्ग, महिला,विद्यार्थ्यांचा सत्कार, प्रेरणादायी व्याख्यान आणि समाजातील विविध स्तरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


## निधन वार्ता

### आबासाहेब बर्वे



**श्रीरामपूर** : येथील मोरगे वस्ती येथील रहिवाशी अमोल व संकेत यांचे वडील मुळाप्रवरा माजी कर्मचारी आबासाहेब संतराम बर्वे यांचे अल्पशा आजाराने दुःख निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले दोन मुली सुना पुतणे जावई नातवंडे असा परिवार होता.

### लव शिंदे



**श्रीरामपूर**, येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सेवा भारती कार्यकारिणी सदस्य, अशोक साखर कारखान्याचे कायदेशीर सल्लागार व जेष्ठ पत्रकार लव शंकरराव शिंदे (वय ६१) यांचे गुरूवार, दि. १४ मे रोजी सकाळी ८ वा. हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ४ भाऊ, १ मुलगी, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते अंकुश, संतोष, कैलास व विलास यांचे बंधु होत. स्व. लव शिंदे हे अत्यंत कष्टाळू कार्यकर्ते व पत्रकार होते.

### रामचंद्र निकम



**श्रीरामपूर**, : तालुक्यातील उंदिरगाव येथील रामचंद्र जगन्नाथ निकम (वय ७१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, बंधु, सुना व नातवंडे असा परिवार आहे. ते जेष्ठ नागरीक संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मणराव निकम यांचे ते बंधु, जेष्ठ शिक्षक अशोक आघाडे यांचे मामा तर बाळासाहेब, प्रमोद, योगेश व सुमित निकम यांचे ते वडील होत.

### चंदा राऊत



**श्रीरामपूर**, : तालुक्यातील हरेगाव फाटा येथील श्रीरामपूर टेलिफोन एक्सचेंजमधील सेवानिवृत्त कर्मचारी चंदा आण्णासाहेब राऊत (वय ७३) यांचे गुरूवार, दि. १४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, सुन, पुतणे व नातवंडे असा परिवार आहे. त्या चितळी, ता. राहाता डिस्टीलरीचे कार्यकारी अधिकारी आण्णासाहेब यादवराव राऊत यांच्या पत्नी व श्रीरामपूर नेवासा रोड येथील शिवसाई ऑटो मोबाईलचे मालक अभिषेक राऊत यांच्या त्या मातोश्री तसेच निलेश, उमेश, नितीन, प्रमोद, मनोज, मिलिंद, राहुल व श्रीकांत राऊत यांच्या चुलती होत्या.

## आज सोनईत 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर'

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : महसूल विभागामार्फत ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या दैनंदिन प्रशासकीय अडचणींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी सोनई येथे आज (१५ मे) 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले आहे.

हे शिबिर १५ मे २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता विश्वलक्ष्मी मंगल कार्यालय, आंबेडकर चौक, सोनई येथे पार पडणार असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून नागरिकांच्या तक्रारी, महसुली कामे व शासकीय योजनांशी संबंधित प्रश्नांचे निराकरण गावपातळीवर करण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांना विविध कार्यालयांचे हेलपाटे टाळून एकाच ठिकाणी आवश्यक सेवा व मार्गदर्शन मिळणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार डॉ. संजय बिरादार, अप्पर तहसीलदार सोनाली म्हात्रे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. शिबिराच्या माध्यमातून महसूल विभागाशी संबंधित विविध कामे, नागरिकांच्या तक्रारी, दाखले, जमीन विषयक प्रश्न, शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

या शिबिराचे आयोजन मंडळ अधिकारी सोनई तसेच सर्व ग्राम महसूल अधिकारी व महसूल सेवक यांनी केले असून नागरिकांनी आपल्या समस्या, कागदपत्रे आणि अर्जासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## श्रीरामपूर बाजार समितीची तीन वर्षांत विकासाची झेप
### उत्पन्नवाढीसह कोट्यवधींची विकासकामे

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळाला तीन वर्षे पूर्ण झाली असून या कालावधीत समितीने आर्थिक शिस्त, विकासकामे आणि शेतकरी हिताच्या योजनांमुळे उल्लेखनीय प्रगती साधली आहे. दि. १३ मे २०२३ रोजी निवडून आलेल्या संचालक मंडळाने आमदार हेमंत ओगले, भानुदास मुरकुटे तसेच नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामांना गती दिली. समितीच्या उत्पन्नात गेल्या तीन वर्षांत सातत्याने वाढ झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये सुमारे ४ कोटी २८ लाख रुपयांचे उत्पन्न नोंदविण्यात आले. त्यानंतर सन २०२४-२५ मध्ये उत्पन्न वाढून सुमारे ४ कोटी ५५ लाखांपर्यंत पोहोचले, तर सन २०२५-२६ मध्ये ते ४ कोटी ६ लाखांहून अधिक झाले आहे. यामुळे बाजार समितीची आर्थिक स्थिती अधिक भक्कम झाल्याचे स्पष्ट झाले आहे. बाजार समितीने तीन वर्षांत सुमारे २ कोटी ५० लाख रुपयांच्या मुदतठेवी केल्या असून कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी १ कोटी ५२ लाख रुपयांचा निधी राखून ठेवला आहे. समितीविरोधातील कायदेशीर प्रकरणांमध्येही समितीच्या बाजूने निकाल लागत असल्याने संचालक मंडळाच्या कामकाजावर विश्वास वाढला आहे. या कालावधीत बाजार समितीने कोट्यवधी रुपयांची विकासकामे पूर्ण केली आहेत. श्रीरामपूर मुख्य मार्केटमधील कांदा मार्केट रस्त्यांच्या काँक्रीटीकरणासाठी सुमारे १ कोटी १९ लाख रुपये खर्च करण्यात आले. भाजीपाला मार्केट परिसरात ८० लाख रुपयांची कामे करण्यात आली. टाकळीभान रोड काँक्रीटीकरणासाठी ८१ लाख रुपये, बेलापूर रोड काँक्रीटीकरणासाठी ६७ लाख रुपये खर्च करण्यात आले. तसेच मुख्य आवारातील १५ नवीन दुकानांच्या बांधकामासाठी सुमारे १ कोटी ५४ लाख रुपयांचा निधी खर्च होत आहे. एकूणच सुमारे ५ कोटी २७ लाख रुपयांची विकासकामे समितीमार्फत पूर्ण करण्यात आली आहेत. शेतकरी बांधवांना सुविधा उपलब्ध करून देण्यावर समितीने विशेष भर दिला आहे.

# नर्स म्हणजे हॉस्पिटलचा कणा : आ. अक्षय कर्डीले
## साईदीपसहयाद्री हॉस्पिटलमध्ये नर्सेस दिन उत्साहात

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : प्रत्येक रुग्णाची संपूर्ण काळजी घेणाऱ्या नर्सेस या हॉस्पिटलचा कणा असतात अहोरात्र न थकता रुग्णांना त्या सेवा देत असतात जसे डॉक्टर्सच्या मार्गदर्शनाखाली उपचार पद्धतीचे योग्य मूल्यमापन करून रुग्णांना सेवा देतात यामुळे हॉस्पिटल रुग्णांच्या विश्वासास पात्र ठरते यामुळे आपलवाधित साईदीपसहयाद्री हॉस्पिटल ने रुग्णांचा विश्वास संपादन केला आहे असे गौरवउदगार आ अक्षय कर्डीले ने व्यक्त केले.



साईदीप सहयाद्री हॉस्पिटल मध्ये नर्ससेस दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे द्विप प्रज्वलन आ अक्षय कर्डीले यांच्या हस्ते झाले यावेळी हॉस्पिटल चे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक डॉ दीपक एस एस, डॉ रवींद्र सोमाणी, डॉ शामसुंदर केकडे, डॉ निसार शेख, डॉ किरण दीपक, डॉ वैशाली किरण, डॉ अनिकेत कुऱ्हाडे, व इतर डॉक्टर्स व नर्सेस मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ अक्षय कर्डीले यांनी मी लहान असताना डॉ दीपक यांच्या दीपक हॉस्पिटलला वडिलांन सोबत जात होतो तेव्हा पासून मी डॉक्टर दीपक सर यांना अत्यंत जवळून पहिले आहे त्यांची वैद्यकीय सेवेतील दूर दृष्टीमुळे नगर मध्ये साईदीपसहयाद्री हे भव्य हॉस्पिटल आज रुग्णांच्या गळ्याचे ताईत बनले आहे अत्याधुनिक वैद्यकीय सेवा व उपचार एकाच छताखाली उपलब्ध असल्याने रुग्णांना इतर महानगरात जाण्याची गरज पडत नाही असे ते म्हणाले प्रास्ताविक करताना डॉ दीपक यांनी साईदीपसहयाद्री हॉस्पिटलच्या निर्मिती पासून अनेक मुद्दे उपस्थित करून स्व शिवाजीराव कर्डीले साहेब यांची वेळोवेळी कशी साथ मिळाली ते नमूद केले लवकरच कॅन्सर रेडियशन युनिट सुरु होणार असून त्याचे काम प्रगती पथावर आहे हे सांगून नर्सेस ची मोलाची साथ आणि अहोरात्र सेवा यामुळे साईदीप
सहयाद्री हॉस्पिटल अपवाधित नावारूपास आले असे सांगितले.

# संवत्सर पुलाचे काम तातडीने पूर्ण करा : आ. काळे

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदारसंघातील जुना मुंबई-नागपूर महामार्ग (एनएच-७५२ आय) वरील संवत्सर येथील गोदावरी नदीवरील पुलाच्या दुरुस्तीच्या कामाला गती देऊन पावसाळ्यापूर्वी वाहतूक सुरू करावी, अशी मागणी आशुतोष काळे यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे. संवत्सर येथील पुलाच्या मध्यभागी भगदाड पडल्याने सुरक्षेच्या कारणास्तव काही महिन्यांपूर्वी पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यानंतर पुलावरील खड्डे बुजविण्याचे व दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असले तरी हे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याची नाराजी नागरिकांतून व्यक्त होत आहे. या मार्गावरील वाहतूक बंद असल्याने



कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांतील व्यापारी, शेतकरी व नागरिकांना मोठा फटका बसत आहे. व्यावसायिकांचे व्यवहार ठप्प झाले असून शेतीमालाच्या वाहतुकीलाही अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे हा मार्ग तातडीने खुला करण्याची मागणी होत आहे. आमदार आशुतोष काळे यांनी यापूर्वी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन पुलाच्या दुरुस्तीसाठी विशेष निधीची मागणी केली होती. त्यानंतर निधी उपलब्ध झाल्याने काम सुरू झाले आहे. पावसाळा तोंडावर आल्याने पुलाचे काम वेगाने पूर्ण करून वाहतूक सुरू करावी, तसेच महामार्गालगतचे नैसर्गिक नाले व पाण्याचे मार्ग खुले करावेत, जेणेकरून पावसाचे पाणी साचून रस्त्याचे नुकसान होणार नाही, अशा सूचना आ. काळे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# नमो उद्यान उभारणीचे धोरण महायुती सरकारचे : स्नेहल खोरे



**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : महाराष्ट्र शासनाने राज्यातील प्रत्येक नगरपालिकेला नमो उद्यान उभारणीसाठी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असताना त्या उद्यानाच्या शुभारंभ पत्रिका व फ्लेक्सवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा नामोल्लेख जाणीवपूर्वक टाळण्यात आल्याची टीका भाजपच्या नगरसेविका स्नेहल खोरे यांनी केली आहे. याबाबत स्नेहल खोरे यांनी म्हटले आहे की, राज्य शासनाच्या माध्यमातून नागरिकांच्या सुविधेसाठी उभारण्यात येणाऱ्या नमो उद्यानासाठी संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला आहे. मात्र, ज्यांच्या

### नरेंद्र मोदींचा नामोल्लेख टाळणे अयोग्य : स्नेहल खोरे

**महाराष्ट्र सरकारने राज्यातील प्रत्येक नगरपालिकेला नमो उद्यानाच्या उभारणीसाठी १ कोटी रुपये निधी दिला आहे. ज्यांच्या नावाने हे उद्यान उभारले जात आहे त्या पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचा नामोल्लेख शुभारंभ पत्रिकेत व फ्लेक्सवर टाळणे सत्ताधारी काँग्रेसच्या संकुचितवृत्तीचे प्रदर्शन असल्याची टीका भाजप नगरसेविका स्नेहल केतन खोरे यांनी केली आहे.**

संकल्पनेतून व प्रयत्नांतून हा प्रकल्प साकार होत आहे, त्या प्रमुख नेत्यांचा उल्लेख उद्घाटन पत्रिका व जाहिरात फलकांवर टाळणे हे सत्ताधारी काँग्रेसच्या संकुचित मानसिकतेचे दर्शन घडवणारे आहे. मध्यंतरी पालकमंत्री ना. विखेंना काँग्रेसचे नगराध्यक्ष शहरातील विकास कामांसाठी भेटायला आल्याने त्यांनी राजकारण बाजूला ठेवून विकासकामांना प्राधान्य दिले असा गैरसमज सर्व श्रीरामपूरकरांचा झाला होता. मात्र केवळ स्वप्रसिद्धीच्या हेतूने महायुतीच्या नेत्यांची नावे वगळली जात असल्याचा आरोप खोरे यांनी केला. नागरिकांना वस्तुस्थिती माहिती असून अशा प्रकारामुळे जनतेसमोर सत्ताधारी काँग्रेसचा खरा चेहरा येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. नमो उद्यान हे नागरिकांसाठी उपयुक्त ठरणारे प्रकल्प असून, त्याचे श्रेय कोणत्याही एका पक्षाने घेण्यापेक्षा शासनाच्या योगदानाची पारदर्शकपणे नोंद होणे आवश्यक असल्याचे मतही खोरे यांनी व्यक्त केले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा
शुक्रवार दि .१५ मे २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत
१७९ २७८ ३७७ — ७-६ — १५० २४० ६००
जोड ७०-४६-३१ २५-६९

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत
१४५ २३५ ५५० — ०-३ — १२० ६७० ३००
जोड ०७-१३-२६- ८९-३४

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत
१५६ १२९ ११० — २-४ — १३० १४९ ११२
जोड २०-८४-५१- ७९-४३

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

द•ख•ल

## बानेश्वर विद्यालय गुणवंत विद्यार्थ्यांचा आ. अक्षय कर्डिलेंच्या हस्ते सत्कार



**अहिल्यानगर :** श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय बु-हाणनगर विदयालयाचा एसएससी परीक्षेचा निकाल ९८.७४ टक्के लागला आहे .एचएससी परीक्षेचा निकाल कला शाखा८८.७५, वाणिज्य शाखा८५.३३,विज्ञान शाखा९८.०७ लागला आहे .सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आ. अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सुभाष कराळे,बोर्डे साहेब, संस्थेचे सर्व संचालक मंडळ,ग्रामस्थ, विदयालयाचे प्राचार्य हापसे के.एम.,सीडी शिकारे,आर वाय झावरे, ग्रामस्थ,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. एसएससी परीक्षा मार्च २०२६ प्रथम कु.कार्तिकी तुकाराम कर्डिले व कु.श्रेया भाऊसाहेब वारुळे,द्वितिय कु.गायत्री दत्तात्रय कर्डिले,तृतिय कु.श्रध्दा विजय कलमदाणे, १२ वी(एचएससी)परीक्षा मार्च २०२६ कला शाखा कु.वैष्णवी विनोद बु-हाडे,प्रथम कु.भाग्यश्री मोहन पटेकर,द्वितिय,कु.श्रध्दा अमोल गवारे तृतिय, वाणिज्य शाखा कु.दिपाली विष्णु डोके,वाणिज्य प्रथम,कु.प्रतिक्षा राजेंद्र वारुळे वाणिज्य द्वितिय,कु. अनुजा लक्ष्मण लष्करें वाणिज्य तृतिय, विज्ञान शाखा ,कु.तनुश्री प्रकाश शिदोरे विज्ञानप्रथम, कु.तन्वी ज्ञानेश्वर तापकिरे विज्ञानद्वितिय,कु.तनिष्क सोमनाथ बनसोडे विज्ञान तृतिय, कु. परमेश्वरी संग्राम जगताप विज्ञान चतुर्थ संस्थेचे अध्यक्ष आ. अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले संस्थेचे सर्व संचालक मंडळ, ग्रामस्थ, विदयालयाचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## मी सावित्रीची लेक १० वी व १२ वी च्या विद्यार्थिनींना पुरस्कार

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर मधील स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम,श्रमीकनगर, यांच्या वतीने दरवर्षी मी सावित्रीची लेक पुरस्कार १० वी, आणि १२ वी मधे ७० पासून पुढे गुण मीळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यर्थिनींना दिला जातो,दिवंगत विठ्ठल बुलबुले सर यांच्या प्रेरणेतून या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे तरी मार्च२०२६च्या परीक्षेत ज्या मुलींना १० वी, आणि१२ वी मधे ७० पासून पुढे गुण मीळवून उत्तीर्ण झालेल्या आहेत.त्यांना मी सावित्रीची लेक पुरस्कार पुरस्कार दिला जाणार आहे.त्यासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी मार्कशीट झेरॉक्स,आधार कार्ड झेरॉक्स,१ पासपोर्ट फोटो, मोबाईल नंबर हे पुरस्कारासाठी लागणारे कागदपत्रे पाठवावीत. विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या मुली व महिलासाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी प्रस्ताव पाठवावेत. सर्व देणगीदार यांच्या सहकार्यातून व सर्व सभासद यांच्या परिश्रमातून दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात.

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**अहिल्यानगर :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी संभाजी महाराजांच्या जीवनकार्याची उजळणी करत त्यांचे शौर्य, स्वाभिमान आणि धर्मनिष्ठा अधोरेखित केली. ते म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराजांनी अवघ्या ९ वर्षांच्या कार्यकाळात १२० हून अधिक लढाया लढल्या आणि एकही युद्ध न हरता मोगल सत्तेला रोखून धरले. त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व आणि धर्मनिष्ठेमुळे त्यांना 'धर्मवीर' म्हणून ओळखले जाते. ते पुढे म्हणाले की, संभाजी महाराजांनी कोणत्याही परिस्थितीत स्वाभिमान आणि धर्मनिष्ठेशी तडजोड केली नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या निधनानंतर त्यांनी स्वराज्याचे रक्षण करत शत्रूंचा मुकाबला केला. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेती सुधारणा यावर त्यांनी विशेष भर दिला होता. या कार्यक्रमास दीपक खेडकर, सचिन जगताप, बाळासाहेब निकम, योगेश एरंडे, गिरीश जगताप आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण समितीत राजेश परदेशी यांची नियुक्ती

**अहिल्यानगर :** जिल्हा रुग्णालय येथे शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या संनियंत्रण व सल्लागार समितीमध्ये राजेश सुरेशलाल परदेशी यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय डी. घोगरे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. या नियुक्तीमुळे जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी, सक्षम आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी सुलभ करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. समितीमधील सदस्य जिल्हा रुग्णालयातील औषध पुरवठा, स्वच्छता व्यवस्था, रुग्णांना उपलब्ध होणाऱ्या सुविधा, वैद्यकीय यंत्रणेचे कामकाज तसेच नागरिकांच्या तक्रारी प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. सर्वसामान्य रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, शासकीय योजनांचा लाभ योग्य पद्धतीने मिळावा आणि रुग्णालयातील व्यवस्थापन अधिक गतिमान व्हावे, यासाठी समिती सक्रियपणे कार्य करणार आहे. यावेळी राजेश परदेशी म्हणाले की, जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण व सल्लागार समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून काम करण्याची संधी दिल्याबद्दल मी राज्य शासन तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानतो. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सेवा मिळणे ही काळाची गरज आहे. राज्य सरकार नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटीबद्ध आहे. जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांच्या अडचणी समजून घेऊन त्या प्रशासनाच्या माध्यमातून सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जातील. दरम्यान, राजेश परदेशी यांच्या या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, राजकीय व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या माध्यमातून जिल्हा रुग्णालयातील सेवा अधिक लोकाभिमुख आणि परिणामकारक होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# १० वी आणि १२ वी ऑनलाईन' निकालाचा गोंधळ

## उन्हातील 'विद्यार्थी शोध' मोहिमेने शिक्षकांचा जीव धोक्यात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शिक्षण विभागाने १० वी आणि १२ वीचे ऑनलाईन निकाल जाहीर करून कौतुक मिळवले असले, तरी प्रत्यक्षात मूळ गुणपत्रके (ऑफलाईन रिझल्ट) न मिळाल्याने राज्यभरात प्रवेश प्रक्रियेचा बोजवारा उडाला आहे. दुसरीकडे, तीव्र उष्णतेच्या लाटेत शिक्षकांना 'विद्यार्थी शोध मोहिमे'साठी सक्तीने रस्त्यावर उतरवले जात असल्याने शिक्षकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, शिक्षक भारती संघटनेने मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रशासकीय धोरणांचा जाहीर निषेध केला आहे.

ऑनलाईन निकाल जाहीर होऊनही विद्यार्थ्यांना अद्याप शाळा सोडल्याचे दाखले (LC) आणि मूळ गुणपत्रके मिळालेली नाहीत. यामुळे महाविद्यालयीन प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करताना तांत्रिक अडचणी येत आहेत. मूळ कागदपत्रांच्या पडताळणीशिवाय प्रवेश निश्चित होऊ शकत नाही, तरीही प्रवेश प्रक्रिया रेटली जात असल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. जोपर्यंत ऑफलाईन निकाल मिळत नाही, तोपर्यंत प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया सुरू करू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे.

उष्णतेची लाट आणि 'मृत्यूचा सापळा' शाळांची पटसंख्या टिकवण्यासाठी शिक्षकांना ऐन उन्हात 'विद्यार्थी शोध मोहिमे'साठी बाहेर पाठवले जात आहे. भद्रावती येथे याच मोहिमेदरम्यान आदर्श शिक्षक राजू हिवंज यांचा उष्माघाताने झालेला मृत्यू आणि मुंबईत 'बीएलओ' कर्तव्यावर असताना अनेक शिक्षक आयसीयूमध्ये दाखल होण्याची घटना वृत्तपत्रामधून समोर आली आहे. प्रतिकूल हवामानात अशा कामांची सक्ती करणे हे मानवी हक्कांचे आणि कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शिक्षक भारती संघटनेचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी ईमेल द्वारे मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, शिक्षण आयुक्त शिक्षण संचालक, जिल्हाधिकारी यांना निवेदनात मागण्या करण्यात आल्या.

### शिक्षक भारतीचा आंदोलनाचा इशारा

विमा संरक्षण: निवडणूक, जनगणना किंवा शैक्षणिक मोहिमेवर असताना अपघात किंवा मृत्यू झाल्यास संबंधित शिक्षकाच्या कुटुंबाला ५० लाख रुपयांचे विमा कवच व वारसाला शासकीय नोकरी द्यावी.

वैद्यकीय खर्च: कर्तव्यावर असताना आजारी पडणाऱ्या शिक्षकांचा १००% वैद्यकीय खर्च शासनाने उचलणे कायदेशीररित्या बंधनकारक करावे.

सक्ती थांबवा: उष्णतेच्या लाटेचा विचार करून शिक्षकांना फिल्ड वर्कची सक्ती करू नये.

या मागणीला आमदार कपिल पाटील,राज्य अध्यक्ष अशोक बेलसरे ,कार्याध्यक्ष सुभाष मोरे,विनाअनुदान कृती समिती राज्याध्यक्ष जयवंत भाबड, सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला अध्यक्ष रूपालीताई बोरुडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे,प्रवीण काळे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, दिगंबर देसाई, सचिव वंदना जाधव, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप, आदींनी पाठिंबा दिला.

> शिक्षण विभागाने केवळ निकालाची घाई केली, पण त्यापुढील प्रवेशाच्या तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष केले आहे. उन्हात शिक्षकांचे बळी जात असताना प्रशासन सुस्त आहे. जर यावर तातडीने कायदेशीर तोडगा निघाला नाही, तर मानवी हक्क आयोग आणि न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यात येईल.
>
> **कार्याध्यक्ष शिक्षक भारती संघटना पुणे विभाग**

## राजकारणाच्या पलीकडे जाऊन मढेवडगावच्या सरपंचांचे समाज हित



**लिंपणगाव :** राजकारणाच्या पलीकडे जाऊन समाजहिताची ज्योत अखंड तेवत ठेवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे मढेवडगावचे लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे. पद, प्रतिष्ठा आणि राजकीय गोंधळ यामध्ये अनेकजण हरवून जातात, पण माणुसकीची ओल जपणारी काही माणसं गावाच्या हृदयात कायमची घर करून राहतात. प्रमोद हे त्यापैकीच एक नाव. सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ कुरुमकर यांच्या मातोश्री आजारी असल्याचे समजताच, कोणताही दिखावा न करता त्यांनी थेट हॉस्पिटलमध्ये जाऊन अत्यंत आत्मीयतेने त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्या भेटीत राजकारण नव्हते, प्रसिद्धी नव्हती होती ती फक्त मायेची ऊब, आपलेपणाची भावना आणि दुःखातही मी तुमच्यासोबत आहे हा दिलासा देणारा आधार. आजच्या काळात अनेकजण निवडणुकीपुरतेच लोकांशी नाते जोडतात, पण प्रमोददादांनी निवडणूक प्रचारादरम्यान दिलेला २४ तास, ३६५ दिवस लोकांच्या सेवेत राहीन हा शब्द केवळ भाषणात न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून जपला आहे.

लोकांच्या सुखात आनंदाने सहभागी होणं आणि त्यांच्या दुःखात खंबीरपणे उभं राहणं, हाच खऱ्या लोकनेत्याचा धर्म असतो आणि तो धर्म प्रमोददादा अत्यंत प्रामाणिकपणे निभावताना दिसत आहेत.

## छ. संभाजी महाराज जयंती मनपाकडून अभिवादन

### बालकलाकारांच्या मर्दानी खेळांनी लक्ष वेधले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने प्रोफेसर कॉलनी चौक येथील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, उपयुक्त मेहेर लहारे, नगरसेवक निखिल वारे, अमोल गाडे, बाळासाहेब पवार, बाबुशेठ नागरगोजे, सुरेश बनसोडे, महेश तवले, करण कराळे, महेश लोंढे, दत्ता गाडळकर, पुष्कर कुलकर्णी, संपत नलवडे, ॲड. अनुराधा येवले, सविता जाधव, सचिन जगताप, बाळासाहेब निकम, ज्येष्ठ नेते श्रीराम येडे, मनोज ताठे, शहर अभियंता मनोज पारखे, इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, सुरज शिंदे, प्रभाग अधिकारी बाळासाहेब पवार, सिद्धीता दरेकर, सविता मोरे आदी उपस्थित होते.

यावेळी महापालिकेच्या वतीने मर्दानी खेळांचे आयोजन करण्यात आले होते. बाल कलाकारांनी तलवारबाजी, दांडपट्टा आदींचे नेत्रदीपक प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणातून महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेची आणि शौर्यगाथेची जिवंत झलक पाहायला मिळाली.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन हे शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाचे प्रतीक आहे. त्यांनी संकटांचा सामना करत स्वराज्य टिकवण्यासाठी दिलेला लढा प्रत्येकाला प्रेरणा देणारा आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. आयुक्त यशवंत डांगे यांनीही मर्दानी खेळ सादर करणाऱ्या बाल कलाकारांचे विशेष कौतुक केले.

या लहान मुलांनी आपल्या कलेतून इतिहास जिवंत केला आहे. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीला आपल्या परंपरेची ओळख होते, असे ते म्हणाले. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनीही आपल्या भाषणातून छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याची उजळणी करत त्यांच्या विचारांचे स्मरण करून दिले.

## प्रोफेसर कॉलनीला धर्मवीर छ. संभाजी महाराज चौक नामकरण करा

### अखंड मराठा साम्राज्य फौंडेशनची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य, त्याग आणि बलिदानाचा गौरव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, या उदात्त भावनेतून अहिल्यानगर शहरातील ऐतिहासिक 'प्रोफेसर कॉलनी' परिसराचे अधिकृत नामकरण धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज चौक असे करण्यात यावे, अशी आग्रही मागणी अखंड मराठा साम्राज्य फौंडेशनच्यावतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात निवेदन महापालिका प्रशासनाला देण्यात आले.

प्रोफेसर कॉलनी परिसरात उभारण्यात आलेला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा भव्य पुतळा हा केवळ स्मारक नसून, तो स्वाभिमान, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रेरणास्थान असल्याची भावना फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. संभाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य, धर्म आणि संस्कृती रक्षणासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान समाजाच्या स्मरणात कायम राहावे, यासाठी या चौकाला त्यांचे नाव देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

फौंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, प्रोफेसर कॉलनी हे नाव या परिसराच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अस्मितेला न्याय देत नाही. ज्या ठिकाणी धर्मवीरांचा भव्य पुतळा दिमाखात उभा आहे, त्या परिसराला त्यांच्या नावाची ओळख मिळणे हा त्यांच्या इतिहासाचा आणि शौर्याचा खरा सन्मान ठरेल.

या मागणीला स्थानिक नागरिक, शिव-शंभू भक्त आणि तरुण वर्गातून मोठा प्रतिसाद मिळत असून, परिसरात व्यापक जनजागृती आणि स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली आहे. प्रशासनाने लोकभावना लक्षात घेऊन कोणतीही दिरंगाई न करता नामकरणास मंजुरी द्यावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही फौंडेशनच्या वतीने देण्यात आला.

यासंदर्भात निवेदन अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर ज्योतीताई गाडे तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांना देण्यात आले. यावेळी ट्रस्ट कमिटी सदस्य संदीप नवसुपे मनोज सोनवणे जिल्हाध्यक्ष अशोक गाडे, निलेश सुंबे, दरेकर काका, शशिकांत भांबरे, संजयजी शिंदे, भाग्येश सव्वाशे, सिद्धांत पानसरे, बालाजी काळे, भरत सुंबे, अभय शेडगे, श्रीपाद दगडे , सौरव गांगर्डे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष अशोक गाडे म्हणाले, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य, त्याग आणि शौर्य हे संपूर्ण राष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या नावाने या चौकाची ओळख निर्माण होणे म्हणजे इतिहासाला अभिमानाने वंदन करण्यासारखे आहे. ही केवळ नामांतराची मागणी नसून, जनतेच्या अस्मितेचा आणि स्वाभिमानाचा आवाज आहे.

## मुकुंदनगर-गोविंदपुरा रस्त्यांची दुरवस्था



### आंदोलनाचा इशारा

**अहिल्यानगर :** मुकुंदनगर व गोविंदपुरा परिसरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना रोजच्या प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक शम्स खान यांनी मनपा आयुक्तांना निवेदन देत रस्त्यांची कामे तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. अन्यथा महापालिका कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मुकुंदनगर भागातील दोन्ही मुख्य रस्ते सुमारे ११ वर्षांपूर्वी तयार झाले असून सध्या रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. शहरातील इतर भागांमध्ये रस्त्यांची कामे सुरू असताना मुकुंदनगरच्या रस्त्यांकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.

गोविंदपुरा ते पोलीस चौकी आणि उखत कॉलनी या रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम मंजूर होऊन वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. मात्र अद्याप कामाला सुरुवात न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर मुकुंदनगर व गोविंदपुरा भागातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची कामे येत्या ८ दिवसांत सुरू करावीत, अन्यथा स्थानिक नागरिकांसह महापालिका कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नगरसेवक शम्स खान,फरहान शेख यांनी दिला आहे.

# महापालिकेत पेन्शन असोसिएशनचे धरणे

## उतार वयात औषधोपचारासाठी पेन्शन देता का पेन्शन?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यांची रखडलेली पेन्शन, सहाव्या वेतन आयोगातील उर्वरित नऊ हप्ते तसेच इतर प्रलंबित आर्थिक मागण्या तात्काळ मंजूर करण्यात याव्यात, या मागणीसाठी महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने महापालिकेत धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान महापालिका प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

महापालिका पेन्शनर असोसिएशनचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी, सेवानिवृत्त कर्मचारी आणि कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांनी महापालिकेच्या आर्थिक नियोजनातील ढिसाळ कारभारामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियमित पेन्शनपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप केला.

आंदोलनादरम्यान आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. निवेदन स्वीकारताना आयुक्तांनी कामगारांचे दोन महिन्यांचे वेतन, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पेन्शन तसेच सहाव्या वेतन आयोगातील फरकाची रक्कम देण्याचे आश्वासन दिले. प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेतल्याने आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.



### दोन महिन्यांचे वेतन व पेन्शन देण्याचे आयुक्तांचे आश्वासन

यावेळी एन. एम. पवळे, एन. एम. देशमुख आणि कामगार नेते कॉ. अनंत लोखंडे यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका मांडली. महापालिकेकडून वेळेवर पेन्शन न मिळाल्याने अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही जण उपचाराअभावी मृत्युमुखी पडले आहेत, असा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलनाच्या प्रारंभी दिवंगत सभासदांना श्रद्धांजली अर्पण करून आंदोलनास सुरुवात करण्यात आली.

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनासमोर अनेक मागण्या मांडल्या. मागील दोन महिन्यांची थकीत पेन्शन तात्काळ अदा करावी, प्रत्येक महिन्याची पेन्शन एक तारखेलाच जमा करण्यात यावी, जीएसटी अनुदान महिन्याच्या पहिल्या तारखेपूर्वी उपलब्ध करून द्यावे, सहाव्या वेतन आयोगाची राहिलेली थकबाकी तत्काळ वितरित करावी तसेच महानगरपालिकेने बंद केलेली पेन्शन विक्री योजना पुन्हा सुरू करावी, अशा मागण्यांचा निवेदनात समावेश होता.

या आंदोलनात मधुकर खताळ, एच. आर. सय्यद, द्वारका किंगर, संजय मुठाळ, बबन काळे, ज्ञानेश्वर धिरडे, किशोर पाखळे, दत्तात्रय व्यापारी, वसंत शिंदे, रंगनाथ गावडे, दिलीप पाठक, रामचंद्र कदम, टेकाळे, संजय पटेकर, बबन खरमाळे, रफिक शेख, एस. एम. बोरगे, ठका कराळे, मोहन खपके, राजेंद्र सारसर, पांडुरंग गाडे, इम्तियाज शेख, अनवर शेख यांच्यासह अनेक सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते.

द • ख • ल

## अधिक मासानिमित्त सासवड एसटी आगाराचा विशेष तीर्थाटन उपक्रम

**सासवड :** अधिक महिन्याचे औचित्य साधून राज्य परिवहन महामंडळाच्या सासवड आगाराच्या वतीने येत्या १७ मे पासून विविध ठिकाणच्या धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी विशेष एस टी फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. आगारप्रमुख मोहिनी ढेरे व वाहतूक नियंत्रककैलास जगताप यांनी याबाबत पत्रकारांना माहिती दिली सासवड ते अष्टविनायक या एक दिवस मुक्काम असणाऱ्या फेरीसाठी महिलांना ७२० तर पुरुषांना १४३८ रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे तर सासवड पंढरपूर तुळजापूर अक्कलकोट, गाणगापूर या फेरीसाठी महिलांना ८३५ व पुरुषांना १६६८ रुपये प्रवास भाडे असणार आहे. शिर्डी नासिक त्र्यंबकेश्वर वणी यासाठी महिलेला ६६५ व पुरुष मंडळींना १३३० शुल्क आकारण्यात येणार आहे. कोल्हापूर ज्योतिबा नाणीज गणपती पुळे यासाठी महिला ७७५ तर पुरुषांना १५५० तिकीट आकारण्यात येणार आहे असे मोहिनी ढेरे यांची सांगितले. जर चाळीस जणांच्या ग्रुपने ३०० किलोमीटर अंतराच्या त्यांच्या आवडीचे ठिकाण निवडले तर त्यासाठीही बस उपलब्ध करून देण्यात येईल असे यावेळी सांगण्यात आले. या अधिक मासाच्या निमित्ताने अधिक पर्यटकांनी या सेवेचालाभ घ्यावा असे आवाहन मोहिनी ढेरे व केलास जगताप यांनी केले आहे.

## विद्या प्रतिष्ठान सोमेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल (CBSE) निकाल शंभर टक्के.

**सोमेश्वरनगर** - बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर विद्या प्रतिष्ठानच्या उइडए इंग्लिश मीडियम स्कूल चा इयत्ता १२ वी विज्ञान तसेच वाणिज्य शाखेचा निकाल जाहीर झाला असून दोन्ही शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत १००टक्के निकाल प्राप्त केला आहे. विज्ञान शाखा या परीक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेतील टॉपर्समध्ये सार्थकी बाळासाहेब कापरे प्रथम क्रमांक, अथर्व अमोल वाडकर द्वितीय क्रमांक आणि वेदांती किरण चाबुकस्वार तृतीय क्रमांकावर आहेत.विषयानुसार विशेष यश: इंग्रजी वेदांती किरण चाबुकस्वार, मॅथेमॅटिक सार्थकी बाळासाहेब कापरे, फिजिक्स सार्थकी बाळासाहेब कापरे, केमिस्ट्री सार्थकी बाळासाहेब कापरे , बायलॉजी अथर्व अमोल वाडकर , इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आयटी सार्थकी बाळासाहेब कापरे, एग्रीकल्चर अथर्व अमोल वाडकर तसेच वाणिज्य शाखा इयत्ता १२ वी (वाणिज्य) मध्ये सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १०० टक्के निकाल लागला आहे. गुणवत्ता यादीत स्माइली पृथ्वीराज यादव प्रथम क्रमांक, उन्नती भावेश पटेल द्वितीय क्रमांक आणि अलिजा रिझवान पठाण तृतीय क्रमांकावर आहेत. विषयानुसार विशेष यश : इंग्लिश स्माइली पृथ्वीराज यादव, इकॉनोमिक पृथ्वीराज धनसिंग गावडे , बिझनेस स्टडीज स्माइली पृथ्वीराज यादव, अकाउंटन्सी पृथ्वीराज धनसिंग गावडे, रिटेल स्माइली पृथ्वीराज यादव व उन्नती भावेश पटेल, एग्रीकल्चर अलिजा रिझवान पठाण विशेष गुण प्राप्त झाल्यामुळे उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षकवर्ग आणि पालकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पारगाव येथे बिबट्याचा हल्ल्यात घोडी मृत्युमुखी

**लोणी धामणी :** पारगाव (ता.आंबेगाव) येथील पारगाव भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या पुर्व बाजूलाच संतोष बबन ढोबळे यांच्या शेतात मेंढपाळ मुक्कामी साठी होते. रात्रीच्या सुमारास बापू शिंदे तसेच बबन शिंदे मेंढपाळ यांच्या दीड वर्षाच्या घोडीवर बिबट्याने हल्ला केला या हल्ल्यात घोडी जागीच मृत पावली आहे यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले आहे.या कुटुंबाला नुकसान भरपाईची मागणी माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे, सामाजिक कार्यकर्ते बजरंग देवडे यांनी केली आहे.मोरगाव सुपा (बारामती) बापू शिंदे आणि बबन शिंदे हे दोघे बंधू असून हे गेल्या अनेक वर्षांपासून पारगाव परिसरात मेंढपाळसाठी वास्तव्यास आहेत. सदरची घटना वनविभागाला समजताच वनविभागाने तत्परतेने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पहाणी केली व पंचनामा केला आहे विठ्ठल ढोबळे सामाजिक कार्यकर्ते बजरंग देवडे यांनी वनविभागाने त्वरित पिंजरा लावावा अशी मागणी केली आहे.

## रागाच्या भरात घर सोडलेला दोन दिवसांनी सुखरूप सापडला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** डुंबरवाडी (ता. जुन्नर )येथून दोन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेला ११ वर्षे ३ महिन्यांचा मुलगा कृष्णा निलेश वामन आज सकाळी आळेफाटा येथे सुखरूप आढळून आला असल्याची माहिती ओतूर पोलिसांनी दिली . त्याला कोणी पळवून नेले नसून तो रागाच्या भरात घरातून निघून गेला होता, असे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे. दि.१२ मे रोजी दुपारी ३:३० वाजता कृष्णा नातेवाईकांच्या घरातून कोणालाही न सांगता निघून गेला होता. मुलाचे वडील निलेश तुकाराम वामन यांनी तक्रार दिल्यानंतर ओतूर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गु.र.नं. १३४/२०२६, बी.एन.एस. कलम १३७(२) नुसार अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवली. ओतूर, आळेफाटा, जुन्नर व परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली. तसेच आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. अखेर आज दि. १४ रोजी सकाळी कृष्णा आळेफाटा येथे मिळून आला. सदर गुन्ह्याचा तपास जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, पोलीस उपनिरीक्षक संदीप आमणे, पोलीस हवलदार दिनेश साबळे, देविदास खेडकर, जनार्धन सापटे,जोतिराम पवार, योगेश ऊर्कीडे,मयुरी खोसे व आशिष जगताप यांच्या पथकाने केला आहे.

# तीर्थक्षेत्र जेजुरीत उड्डाणपुलाची घोषणा

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे जल्लोषात स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर :** महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या तीर्थक्षेत्र जेजुरीच्या विकासाला मोठी चालना मिळणार असून जेजुरी येथे लवकरच उड्डाणपूल उभारण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. या घोषणेमुळे जेजुरीकरांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पालखी मार्गाच्या अपूर्ण कामाचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय मंत्री गडकरी यांनी विशेष बसद्वारे प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी जेजुरी येथे भाजप शहर मंडळाध्यक्ष सचिन पेशवे, पुणे जिल्हा उपाध्यक्ष अलका शिंदे, माजी आमदार अशोक टेकवडे, शहर महिला अध्यक्ष मंगल पवार तसेच भाजप कार्यकर्त्यांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले.

श्री मार्तंड देवसंस्थांना च्या वतीने ट्रस्ट अध्यक्ष ॲड. विश्वास पानसे, विश्वस्त पोपट खोमणे व मंगेश घोणे यांनी गडकरी यांना मल्हार पगडी देऊन सन्मानित केले.

यावेळी तीर्थक्षेत्र असल्यामुळे जेजुरीकडे येणाऱ्या मार्गांवरील टोल रद्द करून स्थानिक नागरिक व भाविकांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच देवसंस्थान



ट्रस्टच्या वतीने गडावर जाणाऱ्या घाटमार्गावर सर्वसामान्य भाविकांसाठी प्रदूषणमुक्त चारचाकी वाहनसेवा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.

जेजुरी शहरातील वाढती वाहतूक कोंडी, भाविकांची वाढती गर्दी आणि शहरातील दळणवळण सुरळीत करण्यासाठी उड्डाणपुलाची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. अखेर या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने स्थानिक नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपच्या वतीने केंद्रीय मंत्री गडकरी यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. जेजुरीच्या विकासासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असून भविष्यातही विविध विकासकामांना गती दिली जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. स्थानिक नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत करत उड्डाणपूल प्रकल्पामुळे वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात सुटून तीर्थक्षेत्र जेजुरीच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे

# खंडोबाच्या गाभाऱ्यात घुमणार मल्हार मंत्र

## थोरवे परिवाराकडून स्मरणार्थ आधुनिक सुविधांचा उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** श्री खंडोबा मंदिर येथे भाविकांना अधिक भक्तिमय आणि सुविधायुक्त वातावरण अनुभवता यावे यासाठी थोरवे परिवाराच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. गाभाऱ्यात प्रवेश करताच विशिष्ट वेळेत भाविकांच्या कानावर मल्हार मंत्राची मधुर धून पडावी, या उद्देशाने 'व्हॉईस ऑफ मल्हार मंत्र' ही आधुनिक स्पीकर यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

हा उपक्रम श्री मार्तंड देवसंस्थानचे ट्रस्टी ॲड. पांडुरंग थोरवे आणि वर्षा थोरवे यांनी कै. ज्योतिभाऊ थोरवे यांच्या स्मरणार्थ राबविला आहे. याच स्मृतीप्रीत्यर्थ अन्नदान कक्षात अत्याधुनिक फॅन यंत्रणा बसविण्यात आली असून, भाविकांना अधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी अनेक दैनंदिन



उपयुक्त साधनसामग्रीही देण्यात आली आहे.

गाभाऱ्यात सतत स्वच्छता आणि मोकळे वातावरण राहावे यासाठी उच्च दर्जाचे व्हॅक्युम क्लिनर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच मंदिर परिसरातील विविध ठिकाणी फॅन बसवून भाविकांच्या सोयीचा विचार करण्यात आला आहे.

थोरवे परिवाराच्या या उपक्रमामुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, धार्मिक स्थळाच्या आधुनिकीकरणासोबत भक्तीभाव अधिक वृद्धिंगत होण्यास मदत होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# थोरांदळे येथे महावितरणच्या हलगर्जीपणाचा बळी ?

## तुटलेल्या वीजतारेचा करंट लागून पाच मुलांच्या आईचा दुर्दैवी मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वळती:**आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे गावामध्ये अत्यंत हृदयद्रावक घटना घडली असून धनगर समाजातील महिलेचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. संगीता बाबाजी तिखुळे (वय ३५) असे मृत महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संगीता तिखुळे या वाड्याशेजारी कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी परिसरात पडलेली व विद्युत प्रवाह सुरू असलेली तुटलेली वीज तार त्यांच्या पायात अडकली. अचानक जोरदार करंट लागल्याने त्या जागीच कोसळल्या. घटनेची माहिती मिळताच रुग्णवाहिका चालक अमर बारवकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत महिलेला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय मंचर येथे दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच मंचर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी



घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. पुढील तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू आहे. ग्रामस्थांच्या माहितीनुसार, संबंधित वीज तार तब्बल पाच दिवसांपासून तुटलेल्या अवस्थेत पडून होती. मात्र महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या ही बाब लक्षात आली नाही किंवा याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. वेळेत दुरुस्ती झाली असती तर एका निष्पाप महिलेचा जीव वाचला असता, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.

या दुर्दैवी घटनेमुळे तिखुळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून मृत महिलेच्या पश्चात पाच लहान मुले आहेत. आईच्या अचानक जाण्यामुळे कुटुंब उघड्यावर आले असून संपूर्ण गावातून हळहळ व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच आंबेगाव तालुक्यातील चांडोली गावातही अशाच प्रकारची दुर्घटना घडली होती. त्यामुळे तालुक्यातील ही दुसरी घटना ठरली असून महावितरणच्या कारभाराबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वारंवार घडणाऱ्या अशा दुर्घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. धनगर समाजातूनही तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून मृत महिलेच्या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत द्यावी, तसेच तालुक्यातील धोकादायक वीज तारा तातडीने दुरुस्त कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## पुणे ग्रामीणमधील अपघात रोखण्यासाठी ओतूर पोलिसांचा पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** पुणे ग्रामीण हद्दीतील वाढते अपघात रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल्ल यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील अपघातांचे प्रमाण १५ ते २० टक्के ने कमी करण्याच्या उद्देशाने रोड सेफ्टी व चालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत पुणे ग्रामीण पोलीस दलाकडून संपूर्ण घटकामध्ये महत्त्वाच्या ठिकाणी जनजागृतीपर सूचनाफलक लावण्याच्या सूचनेच्या अनुषंगाने ओतूर पोलीस स्टेशनने पाऊल उचलले आहे. विशेषतः अपघातप्रवण क्षेत्रे, तीव्र वळणे, घाटरस्ते, शाळा–महाविद्यालय परिसर आणि महामार्गांवरील धोकादायक ठिकाणी हे फलक लावण्यात येणार असल्याची माहिती ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली. याबाबत बोलताना पोलीस प्रशासनाने सांगितले की, ''केवळ दंडात्मक कारवाई न करता चालकांमध्ये स्वयंशिस्त निर्माण होणे गरजेचे आहे. हे सूचनाफलक वाहनचालकांना वारंवार सुरक्षिततेची आठवण करून देतील.'' या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागरूकता वाढून अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी होईल, असा विश्वास बाजगिरे यांनी व्यक्त केला आहे. नागरिकांनी देखील वाहतुकीचे नियम पाळून पोलिसांना सहकार्य करावे, असे देखील आवाहन करण्यात आले आहे.



## नागरिकांना सुविधा देण्यासाठी 'नमो उद्यान' महत्त्वपूर्ण ठरणार : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आळंदी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपरिषद सातत्याने प्रयत्नशील आहे. प्रभाग क्र. ०९ मधील नागरिकांना दर्जेदार आणि आधुनिक सुविधा मिळाव्यात, यासाठी सुमारे १ कोटी रुपये खर्चातून 'नमो उद्यान' उभारण्यात येत आहे. या उद्यानामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, मुलांसाठी सुरक्षित खेळणी, महिलांसाठी फिरण्याचा ट्रॅक तसेच युवकांसाठी व्यायामाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असून हे उद्यान नागरिकांच्या आरोग्यदायी आणि आनंदी जीवनशैलीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे प्रतिपादन नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले. आळंदी नगरपरिषदेच्या प्रभाग क्र. ०९ मध्ये नागरिकांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुमारे १ कोटी रुपये खर्चाच्या नमो उद्यान चे भूमिपूजन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे भूमिपूजन नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, सभागृह नेते सचिन गिलबिले, स्थानिक नगरसेवक दिनेश घुले, नगरसेविका अर्चना तापकीर, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, गोविंदा कुऱ्हाडे, रामचंद्र भोसले, सागर कुऱ्हाडे, सुरेश झोंबाडे, नगरसेविका उज्वला काळे, माजी नगरसेवक प्रदीप बवले, अनिकेत तापकीर, कालिदास तापकीर, सुदर्शन चौधरी, रोहन पवार, गणेश कोकाटे, सारंग तापकीर, नवनाथ थोरवे, माऊली धुले तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक नगरसेवक दिनेश घुले यांनी आपल्या मनोगतात प्रभागातील नागरिकांना विरंगुळा, व्यायाम आणि मुलांसाठी सुरक्षित खेळण्याची जागा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे उद्यान उभारण्यात येत असल्याचे सांगितले. नागरिकांच्या मागणीनुसार हा विकास प्रकल्प साकारत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाघोली :** कृषी कन्या निवासी प्रकल्प, वाघोली येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला विद्यार्थी, ग्रामस्थ आणि संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विठ्ठलवाडी, तळेगाव ढमढेरे येथील ग्रामस्थ निवृत्ती अण्णा गवारे, वडू खुर्द येथील ग्रामस्थ सचिन संजय पवळे, संस्थेचे अध्यक्ष डॉ. कैलास पवार, प्रकल्प संचालिका अध्यापिका अनिता पवार तसेच निवासी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. सर्वांनी मानवंदना देत छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाला अभिवादन केले. प्रतिमेच्या पूजनावेळी सचिन संजय पवळे यांनी जोशपूर्ण शंभू गर्जना करत संपूर्ण परिसर शिवमय वातावरणाने दुमदुमून टाकला. त्यांच्या घोषणेमुळे विद्यार्थिनींमध्ये उत्साह आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले. यावेळी निवृत्ती अण्णा गवारे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान हे केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे तर संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे. धर्म, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा यासाठी त्यांनी दिलेले सर्वोच्च बलिदान प्रत्येक पिढीने स्मरणात ठेवणे गरजेचे



आहे. त्यांच्या त्यागाची जपणूक करणे हीच खरी त्यांना मानवंदना ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. कैलास पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, छत्रपती संभाजी महाराजांनी धर्म आणि स्वराज्यासाठी असह्य यातना सहन करूनही कधीही माघार घेतली नाही. त्यांच्या जीवनातील संघर्ष, पराक्रम, शौर्य आणि अदम्य इच्छाशक्ती आजही प्रत्येकाच्या अंगावर शहारे आणते. आयुष्यात एकही लढाई न हरलेले आणि सतत विजयाच्या दिशेने वाटचाल करणारे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज हे युवा पिढीसाठी कायम प्रेरणास्थान राहतील, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित घोषवाक्ये, प्रेरणादायी विचार आणि देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून अभिवादन केले. संपूर्ण कार्यक्रम देशभक्ती, इतिहासप्रेम आणि स्वराज्याच्या विचारांनी भारलेला होता. कार्यक्रमाचे आयोजन भूमी फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले असून उपस्थितांनी जय जिजाऊ, जय शिवराय, जय शंभूराजेंच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

## पुणे जिल्ह्यातील झेडपी शाळांना मिळणार 'शिपाई मामा'

# ग्रामपंचायत स्तरावर भरतीचा बिगुल वाजला!




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

''**नाझरे सुपे :** पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये वर्षानुवर्षे रिक्त असलेल्या शिपाई पदांचा प्रश्न आता स्थानिक पातळीवर सुटणार आहे. शाळांमधील दैनंदिन शिस्त, स्वच्छता आणि शालेय कामकाजात मदत करण्यासाठी ग्रामपंचायतींना आता स्वतःहून शिपाई नेमण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी या संदर्भात ८ मे २०२६ रोजी सर्व पंचायत समित्यांना स्पष्ट निर्दे श दिले आहेत.

'**शाळेच्या कामात येणार सुसूत्रता** शिक्षण विभागाने दिलेल्या अहवालानुसार, शाळांमध्ये शिपाई नसल्यामुळे दैनंदिन शालेय कामकाज, स्वच्छता आणि परिसर देखभालीवर विपरीत परिणाम होत होता. ही अडचण दूर करण्यासाठी आता महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ६१ चा आधार घेत, ग्रामपंचायतींना आपल्या कार्यक्षेत्रातील शाळांसाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देता येणार आहे.निवडीसाठी प्रशासकीय निकष ' निकड पडताळणी: शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या आणि प्रत्यक्ष कामाची गरज पाहूनच नियुक्ती करावी. आर्थिक तरतूद: ग्रामपंचायतीने स्वतःची आर्थिक स्थिती आणि उपलब्ध निधी विचारात घेऊनच ही कार्यवाही करावी. ''शिक्षण विभाग समन्वय: नियुक्तीपूर्वी शिक्षण विभागाशी समन्वय ठेवून आवश्यकतेबाबत खातरजमा करणे अनिवार्य आहे. ''नियमपालन: ही कार्यवाही करताना शासन निर्णय आणि प्रचलित ग्रामसूचीतील तरतुदींचे पालन करावे.

**स्थानिक रोजगाराला मिळणार बळ** या निर्णयामुळे प्रत्येक गावात स्थानिक सुशिक्षित तरुणांना आपल्याच गावच्या शाळेत सेवा करण्याची आणि

### शाळेच्या देखभालीसाठी स्थानिक तरुणांना संधी; मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांचे महत्त्वपूर्ण आदेश

रोजगाराची संधी मिळणार आहे. यामुळे शाळा व्यवस्थापनात गावचा सहभाग वाढून शाळांच्या भौतिक सुविधेत सुधारणा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. **प्रशासकीय संदेश** ''शाळा हे गावचे भविष्य घडवणारे केंद्र आहे. तिथली स्वच्छता आणि व्यवस्थापन नीट राहण्यासाठी शिपाई पदाची मोठी भूमिका असते. ग्रामपंचायतींनी या पत्रातील तरतुदींनुसार आणि आर्थिक क्षमतेनुसार तातडीने नियमोचित कार्यवाही करावी.''गजानन पाटील (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद.

# भवानी पेठेतच माऊलींचा मुक्काम प्रशासनाच्या लेखी हमीनंतर पालखी मुक्कामावरील संभ्रम अखेर दूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून वारकरी संप्रदायात चर्चेचा विषय ठरलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पुणे मुक्कामाबाबतचा संभ्रम अखेर दूर झाला असून, यंदाही माउलींची पालखी पुण्यातील भवानी पेठेतील श्री पालखी विठोबा मंदिरातच मुक्कामी राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रशासनाने दिलेल्या लेखी हमीनंतर श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदीने अधिकृत घोषणा केली. वारकऱ्यांची वाढती संख्या, अपुरी जागा, पार्किंगची अडचण तसेच दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना ऊन-पावसाचा होणारा त्रास यामुळे यंदाचा मुक्काम अन्यत्र हलवण्याची चर्चा रंगली होती. विशेषतः सन २०१० पासून रेसकोर्स मैदानावर मुक्काम हलवण्याची मागणी सातत्याने होत होती. या पार्श्वभूमीवर संस्थान कमिटीने १३ एप्रिल २०२६ रोजीची बैठकही स्थगित केली होती. मात्र अखेर प्रशासनाने ठोस उपाययोजनांची लेखी ग्वाही दिल्यानंतर भवानी पेठेतील मुक्काम कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी पालखी सोहळा प्रमुख ॲड.राजेंद्र उमाप यांना दिलेल्या पत्रात मंदिर परिसरातील गर्दी नियोजनासाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. मंदिरालगतच्या तीन खाजगी मालमत्ता ताब्यात घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, मंदिरासमोरील अतिक्रमणे हटवून परिसर मोकळा करण्यात येत आहे. तसेच भाविकांच्या सोयीसाठी नवीन रस्ता निर्मिती, अडथळा ठरणारे विद्युत खांब स्थलांतरित करणे आणि पालखी मार्गावरील अतिक्रमणांवर युद्धपातळीवर कारवाई




सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

हा पेच सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ तसेच आमदार हेमंत रासने यांनी विशेष प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. पुणे महानगरपालिकेकडून या विकासकामांसाठी तब्बल १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, ३१ मे २०२६ पर्यंत आवश्यक जागा ताब्यात घेण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. यंदाचा श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा ८ जुलै रोजी दुपारी ३ वाजता आळंदीतून प्रस्थान ठेवणार असून, ९ आणि १० जुलै रोजी पालखीचा मुक्काम पुण्यातील भवानी पेठेत राहणार आहे. प्रशासनाच्या हमीपत्रानंतर बुधवारी देवस्थानची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, ॲड. रोहिणी पवार, पालखी सोहळा मालक राजेंद्र आरफळकर, दिंडी समाजाचे अध्यक्ष भाऊ महाराज गोसावी तसेच व्यवस्थापक माऊली वीर उपस्थित होते.

दखल

## व्हा.चेरमन पदी बबनराव कोकाटे यांची निवड



**चिचोंडी पाटील :** गावच्या सहकार चळवळीला नवे बळ देणाऱ्या चिचोंडी पाटील सेवा सोसायटीच्या उपाध्यक्षपदी (व्हा.चेअरमन) बबनराव बाळाजी कोकाटे यांची बिनविरोध निवड होताच गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सहकार क्षेत्रातील ही निवड गावच्या एकोप्याचे आणि विश्वासाचे प्रतीक ठरली. माजी उपाध्यक्ष काशिनाथ वाडेकर यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी ही निवड प्रक्रिया पार पडली. कोणतीही निवडणूक न लागता सर्वसंमतीने बबनराव कोकाटे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याने त्यांच्या कार्यशैलीवर सभासदांनी दाखविलेला विश्वास अधोरेखित झाला. निवडीनंतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना मान्यवरांनी पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव करत नूतन पदाधिकाऱ्यांनी सभासदांचे हित, संस्थेची आर्थिक प्रगती आणि पारदर्शक कारभार यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. सेवा सोसायटी ही केवळ आर्थिक संस्था नसून गावच्या विकासाचा कणा आहे, असे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास चेअरमन संदीप कोकाटे, माजी सरपंच पांडुरंग कोकाटे, माजी चेअरमन महादेव खडके, डॉ. मारुती ससे, विश्वासागर कोकाटे, पंडितराव कोकाटे, अंबादास फिसके, चंद्रकांत सदाफुले, कासमशेठ सय्यद, प्रशांत कांबळे, संदीप काळे, ज्ञानेश्वर ठोंबरे, दत्तू धुळे, वैभव कोकाटे, ह.भ.प. बाबासाहेब परकाळे, सचिव दत्ता झांबरे यांच्यासह सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी चेअरमन संदीप कोकाटे व माजी उपाध्यक्ष डॉ. मारुती ससे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## दत्त देवस्थान बनले भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र
## आरती व प्रसादाला उस्फूर्त प्रतिसाद



**सुपा :** नगर-पुणे महामार्गालगत वसलेले जागृत देवस्थान असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील वाघुडे येथील दत्त देवस्थान सध्या भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. दर गुरुवारी आयोजित करण्यात येणाऱ्या आरती व महाप्रसाद उपक्रमाला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून देवस्थानच्या वतीने प्रत्येक गुरुवारी सकाळी सामूहिक आरती व प्रसाद वाटपाचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या धार्मिक उपक्रमामुळे दत्त भक्तांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत असून, गुरुवारी पहाटेपासूनच देवस्थान परिसरात भाविकांची गर्दी होत आहे. दत्त महाराजांच्या नामस्मरणाने संपूर्ण परिसर दुमदुमून जात असून, भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळत आहे. सकाळी विधिवत पूजा, मंत्रोच्चार आणि आरती पार पडत असून, त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येते. नगर-पुणे महामार्गालगत देवस्थान असल्यामुळे प्रवासी, वाहनचालक तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या श्रद्धेने येथे दर्शनासाठी थांबत आहेत. दत्त भक्तांच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामागे समाजात अध्यात्म, श्रद्धा आणि एकोप्याची भावना वाढीस लागावी हा मुख्य उद्देश असल्याचे देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, प्रत्येक गुरुवारी विविध गावांमधून भाविक येथे दर्शनासाठी येत असून महिलांची उपस्थितीही लक्षणीय दिसून येत आहे.

## कुकडीचे उन्हाळी हंगामाचे
## दुसरे आवर्तन केव्हा सुटणार

**लिपणगाव :** श्रीगोंदा, पारनेर, कर्जत, करमाळा, येसवडी या तालुक्यांना वरदान ठरलेल्या कुकडी कालव्याचे उन्हाळी हंगामातील दुसरे आवर्तन केव्हा? सुटणार? असा सवाल कुकडी लाभ क्षेत्रातून शेतकऱ्यांनी केला आहे. दरम्यान घोड धरणाचे उन्हाळी हंगामातील आवर्तन वेळेत सुटले, आता हे आवर्तन अंतिम टप्प्यात आहे. मात्र कुकडीचे दुसरे आवर्तन अद्याप न सुटल्यामुळे शेतकऱ्यांमधून संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील कुकडीचे उन्हाळी हंगामाचे पहिले आवर्तन सोडले, परंतु हे आवर्तन कुकडीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची भरणी न होता व फक्त पोट चाऱ्या ओल्या करून पाणी बंद केल्यामुळे शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या अनागोंदी कारभाराबद्दल आक्षेप नोंदवला. व निषेधही केला. दरम्यान जिल्ह्याचे पालकमंत्री व तालुक्याचे लोकप्रतिनिधीकडून कुकडीच्या उन्हाळी हंगामातील दुसऱ्या आवर्तनासंदर्भात प्रशासकीय पातळीवर अनभिज्ञ दिसून येत आहेत. वास्तविक पाहता श्रीगोंदा तालुक्याच्या लोकप्रतिनिधींनीच कुकडीच्या आवर्तना संदर्भात विना विलंब कालवा सल्लागार समितीची बैठकी बाबत पुढे होऊन शेतकऱ्यांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसंदर्भात निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. कारण उन्हाळी हंगामाची तीव्रता अत्यंत भयानक आहे. कुकडी लाभक्षेत्रात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तितकाच जटील बनला आहे. पिण्याच्या पाण्याबरोबर जनावरांच्या पाण्याचा देखील प्रश्न अत्यंत तीव्र स्वरूपाचा दिसून येत आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तात्काळ आवर्तन सोडणे हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे कुकडी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे.



**शिराळ चिचोंडी येथे नवनिर्वाचित आ. अक्षय कर्डिले यांच्या ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पैलवान अमोल वाघ, माजी चेअरमन रामदास गोरे, शिवाजीराव घोरपडे, माजी उपसरपंच किसन दारकुंडे, गणेश तुपे, राजू घोरपडे, पैलवान रामनाथ, वाघ बाबासाहेब, वाघ जालू सर, आदिनाथ चव्हाण, शिवाजी खाटेकर, पोपटनाचा तागड, भाऊ खाटेकर, माणिक गडाख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.**

# ‘बुलेट राजां’च्या आवाजाने नागरिक त्रस्त

## कर्णकर्कश सायलेन्सरचा जामखेडमध्ये धुमाकूळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**जामखेड :** गेल्या काही वर्षांपासून जामखेड शहरात दुचाकींना, विशेषतः बुलेटला फेरबदल केलेले (मॉडिफाईड) आणि कर्णकर्कश आवाज करणारे सायलेन्सर लावण्याचे फॅड मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. या सायलेन्सरच्या आवाजामुळे शहरातील सर्वसामान्य नागरिक, वयोवृद्ध आणि लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आले असून, प्रशासनाने या 'बुलेट राजां'वर कडक कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

शहरातील मुख्य रस्ते असोत वा गल्लीबोळ, ठराविक दुचाकीचालक आपल्या गाड्यांना कंपनीचे सायलेन्सर काढून फटाक्यासारखा किंवा इंजिनचा मोठा आवाज निघणारे सायलेन्सर बसवत आहेत. दिवसा तर हा त्रास होतोच, पण रात्री-अपरात्री शांततेच्या वेळी हे चालक मुद्दाम मोठ्याने आवाज करत फिरतात. अचानक होणाऱ्या या आवाजामुळे झोपेत असलेल्या लहान मुलांची घाबरून झोपमोड होत आहे, तर हृदयविकार असलेल्या वयोवृद्धांच्या काळजाचा ठोका चुकत आहे. शांतता क्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रुग्णालय आणि शाळांच्या परिसरातही या दुचाकींचा उपद्रव थांबलेला नाही.

विस्ताराच्या मानाने जामखेड शहर मोठे आहे. वाढत्या लोकसंख्येसोबतच वाहनांची संख्याही प्रचंड वाढली आहे. ही वाहतूक व्यवस्था सांभाळताना स्थानिक पोलिसांना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेष म्हणजे, जामखेड वाहतूक शाखेकडे कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता आहे. उपलब्ध असलेल्या कमी मनुष्यबळावर शहरातील चौक आणि मुख्य रस्त्यांवरील वाहतूक नियंत्रित करण्याचा प्रयत्न पोलिस प्रशासनाकडून केला जात आहे. मात्र, या मनुष्यबळाच्या कमतरतेचा फायदा हे उडाणटप्पू दुचाकीस्वार घेत असल्याचे चित्र दिसत आहे.

प्रादेशिक परिवहन विभागाच्या (RTO) नियमानुसार, कंपनीने दिलेल्या सायलेन्सरमध्ये बदल करणे किंवा आवाजाची मर्यादा ओलांडणारे सायलेन्सर बसवणे हा कायदेशीर गुन्हा आहे. अनेक शहरांमध्ये पोलिसांनी अशा गाड्या जप्त करून त्यांच्या सायलेन्सरवर बुलडोझर फिरवून नष्ट करण्याची मोहीम हाती घेतली आहे. जामखेडमध्येही अशाच प्रकारच्या धडक मोहिमेची आवश्यकता आहे. जोपर्यंत पोलिसांचा कायद्याचा बडगा उगारला जात नाही, तोपर्यंत हे 'सायलेन्सर फॅड' थांबणार नाही, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# हर घर जल योजनाचा लाभ गावकऱ्यांपासून दूर

**चापडगाव :** शेवगाव तालुक्यातील गदेवाडी मध्ये नागरिकांना आजही नियमित पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असून केंद्र सरकारच्या हर घर जल योजनेचा लाभ प्रत्यक्षात मिळत नसल्याची नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचविण्यासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. गावात पाइपलाइन टाकणे विविध विकासकामे करण्यात आली. मात्र अनेक ठिकाणी कामे पूर्ण झाल्याचे दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरू झालेला नाही.

गावासाठी पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन १९९६-९७ मध्ये सुरू करण्यात आली होती. खुंटेफळ जलशुद्धीकरण केंद्रातून तळणी, घोटण, नजिक बाभुळगाव, कुरुडगाव-रावतळे मार्गे गदेवाडीपर्यंत ही पाइपलाइन टाकण्यात आली होती. मात्र सद्यस्थितीत ही पाइपलाइन कालबाह्य झाली असून अनेक ठिकाणी गळती होत आहे.

याशिवाय पाइपलाइनवर अनेक ठिकाणी बोगस कनेक्शन घेतल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या अनधिकृत जोडण्यांवर प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. परिणामी गदेवाडीपर्यंत पाणी पोहोचण्यास मोठा विलंब होत असून नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

शासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत, जुन्या पाइपलाइनची दुरुस्ती करावी आणि नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. गावाला सध्या २५ ते ३० दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे.

# लोककल्याणाच्या बळावर शिवरायांनी उभे केले स्वराज्य

## प्रा. बानगुडे यांच्या शिवव्याख्यानाने परिसर भारावला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**चिचोंडी पाटील :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी केवळ तलवारीच्या धाकावर केली नाही, तर दूरदृष्टी, बुद्धिमत्ता, अचूक नियोजन आणि रयतेप्रती असलेल्या अपार प्रेमाच्या बळावर इतिहास घडविला. प्रत्येक ठिकाणी बळ नव्हे तर बुद्धी वापरा, हेच शिवरायांचे खरे तत्वज्ञान होते, असे परखड प्रतिपादन प्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील यांनी केले. त्यांच्या ओजस्वी आणि अभ्यासपूर्ण शिवव्याख्यानाने चिचोंडी पाटील परिसर अक्षरशः शिवमय झाला.

प्रबोधनमंच व स्वातंत्र्यवीर सावरकर वाचनालय, चिचोंडी पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रबोधन व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प गुंफताना प्रा. बानगुडे शिवचरित्र या विषयावर बोलत होते. त्यांच्या भाषणातील ऐतिहासिक संदर्भ, तडफदार मांडणी आणि प्रेरणादायी विचारांनी उपस्थित श्रोत्यांना भारावून टाकले.

मुठभर सैन्य घेऊन बलाढ्य शत्रूंना पराभूत करण्याची किमया शिवरायांनी केवळ बुद्धी आणि युक्तीच्या बळावर साध्य केली. युद्धभूमी असो वा राज्यकारभार, प्रत्येक ठिकाणी त्यांनी संयम, नियोजन आणि लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले, असे सांगताना प्रा. बानगुडे यांनी शिवचरित्रातील अनेक प्रेरणादायी पैलूंवर प्रकाश टाकला.

ते पुढे म्हणाले, शिवराय हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर लोककल्याणकारी राजे होते. युद्धात धारातीर्थी पडलेल्या मावळ्यांच्या कुटुंबीयांसाठी त्यांनी फॅमिली पेन्शनची व्यवस्था केली. अनुकंपा तत्वावर त्यांच्या वारसांना सैन्यात सामावून घेतले. अविवाहित मावळ्यांच्या आई-वडिलांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारीही राज्याने स्वीकारली होती.

# शिराळ वस्ती ४५ दिवसापासून अंधारात!

## विजे अभावी टोमॅटोचे पीक जळून खाक : शेतकरी चिंतातुर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी एकीकडे राज्य सरकार प्रशासन गतिमान आशा जाधव करत असताना दुसरीकडे पाथर्डी तालुक्यातील शिराळ शिवारात गेल्या ४५ दिवसापासून शेतकरी अंधारात चाचपडत आहेत. महावितरणच्या गल्थान कारभारामुळे आणि तारीख पे तारीख देण्याच्या धोरणामुळे उभ्या बागा जळून खाक झाल्या असून संतप्त शेतकऱ्यावर आता आपली जनावरे विकून गाव सोडणची वेळ आली आहे .

दोन महिन्यापूर्वी तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने शिराळ शिवारातील मुळे वस्ती, चेमटे वस्ती, पाथरकर वस्ती, दारकुंडे वस्तीला मोठा तडाखा दिला होता. यात महावितरणाचे मुख्य वाहिनीचे १० आणि अंतर्गत वाहिनीचे १६ असे एकूण २६ पोल जमीन दोस्त झाले. या संदर्भात दैनिक राष्ट्र सह्याद्रीने वृत्त प्रसिद्ध करताच झोपलेले महावितरण अधिकारी जागे झाले. आणि त्यांनी पडलेले पोल उभे केले. मात्र गेल्या दीड महिन्यापासून या पोलवर तारा ओढण्याचे काम अद्यापही प्रलंबित आहे.पोल उभी आहेत पण वीज गायब अशी विचित्र परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. विजे अभावी पाणी उपसा करणारे पंप बंद असल्याने विहिरीला पाणी असून डोळ्यादेखत पिके करपताना पाहण्याची दुर्दैवी वेळ शेतकऱ्यावर आली आहे

रमेश पाथरकर यांच्या एक एकर क्षेत्रातील टोमॅटोची बाग विजे अभावी जळून खाक झाली आहे. यात सुमारे पाच लाखाचे उत्पन्न बुडाले असून एक लाख रुपयाचा खर्चही पाण्यात गेला आहे. परिसरातील संत्रा बागा, मका आणि इतर नगदी पिके पूर्णपणे वाळून गेली आहेत. पाणी आणि चाऱ्या अभावी दुभूती जनावरे सांभाळणे कठीण झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी पशुधन कवडीमोल भावात विकून टाकले आहे.

यासंदर्भात पाथर्डीचे उपकार्यकारी अधिकारी मयूर जाधव यांनी ठेकेदारांच्या संपाचे कारण पुढे केले आहे. टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन साहित्य उपलब्ध करून दिले असले तरी ठेकेदारांचा संप असल्याने काम रखडल्याचे त्यांनी सांगितले.

# तरुणीच्या आत्महत्येनंतर प्रियकराविरोधात गुन्हा

**जामखेड :** लग्नाचे आश्वासन देत दोन वर्षे प्रेमसंबंध ठेवून नंतर लग्नास नकार देत जीवे मारण्याची धमकी दिल्याने एका २९ वर्षीय तरुणीने विषारी इंजेक्शन टोचून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना जामखेड येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून प्रियकराविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत माहिती अशी की, शबनम दस्तगीर सय्यद (वय२९) या जामखेड येथील रहिवासी असून परिचारिका म्हणून काम करत होत्या. त्यांचे लग्न २०१३ मध्ये झाले होते. मात्र पतीकडून होणाऱ्या मारहाणीमुळे त्यांनी २०२३ मध्ये घटस्फोट घेतला होता. त्यानंतर त्या आपल्या दोन मुलांसह आई-वडिलांकडे राहत होत्या.

दरम्यान, शिक्षण घेत असताना त्यांची ओळख अली अब्दुल पठाण (रा. आष्टी, जि. बीड) याच्याशी झाली होती. ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. अली पठाण याने शबनम यांच्याशी लग्न करण्याचे आश्वासन देत दोन वर्षे संबंध ठेवले. मात्र गेल्या काही महिन्यांपासून तो लग्नास टाळाटाळ करून तुझे तुकडे करून फेकून देईल, अशी धमकीही देत होता.

या मानसिक त्रासामुळे शबनम यांनी २२ एप्रिल रोजी रात्री त्या जामखेडच्या लोंढे हॉस्पिटलमध्ये ड्युटीसाठी गेल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी ११.३० च्या सुमारास त्यांनी हॉस्पिटलच्या बाथरूममध्ये विषारी औषध इंजेक्शनद्वारे शरीरात टोचून आत्महत्या केली. या प्रकरणी शबनम यांच्या आई शायना दस्तगीर सय्यद यांनी जामखेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून अली अब्दुल पठाण याच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंद घर फोडले
## सव्वा लाखांचे दागिने लंपास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील कोर्ट गल्ली भागात भरदिवसा घरफोडीची घटना घडली असून, अज्ञात चोरट्यांनी बंद घराचा कडी-कोयंडा उचकटून १ लाख ३२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगल भाऊसाहेब फुलसौंदर या महिला फिर्यादी विठ्ठल मंदिराजवळ राहतात. त्या घराला कुलूप लावून बाहेर गेल्या असताना चोरट्यांनी ही संधी साधली. चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे स्क्रू काढून आत प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटाचा कप्पा कशाच्या तरी साहाय्याने उचकटून त्यातील मौल्यवान दागिने लंपास केले. यामध्ये ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनीगंठण, ४० हजार रुपयांचा सोन्याच्या मण्यांचा सर, ४० हजार रुपयांचे तीन पदरी गंठण आणि १२ हजार रुपयांची सोन्याची अंगठी असा एकूण १ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. या घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संभाजी गायकवाड आणि पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी घटनास्थळाची पाहणी केली. फिर्यादी मंगल फुलसौंदर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार चोरीचा गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार अडसरे करत असून, शहरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेतला जात आहे. वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# शिवतीर्थ जल आणण्यासाठी १६ मे रोजी रवाना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान व श्री शिवराज्याभिषेक उत्सव समिती, जामखेड यांच्या वतीने ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी निमित्त श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी लागणारे पवित्र 'शिवतीर्थ जल' आणण्यासाठी सप्त गडकोटांची २ दिवसीय यात्रा शनिवार, दि. १६ मे २०२६ रोजी रात्री १०:३० वाजता जामखेड येथून रवाना होणार आहे.

किल्ले तोरणा, किल्ले राजगड, किल्ले रोहिडेश्वर, सरसेनापती येसाजी कंक यांचा वाडा, किल्ले कावळ्या, राजधानी किल्ले रायगड व राजमाता जिजाऊ आऊसाहेब यांचे समाधीस्थळ या पवित्र ठिकाणांहून शिवभक्त जल आणणार आहेत.

या जलाने ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला पहाटे शिवछत्रपतींच्या मूर्तीवर जलाभिषेक केला जाणार आहे.

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे पांडुरंग भोसले यांनी सांगितले की, प्रतिवर्षीप्रमाणे आपण गडकिल्ले व तीर्थक्षेत्र या ठिकाणाहून जल घेऊन येतो.

या शिवतीर्थ यात्रेतून तरुणांना गडकिल्ले, सह्याद्री व आपल्या पूर्वजांच्या इतिहासाची जाणीव होते. हा उत्सव जामखेडकरांचा गावचा उत्सव झाला आहे. नागरिक, माता-भगिनी हजारोंच्या संख्येने सहभागी होतात.

बाहेर कामानिमित्त, शिक्षणानिमित्त गेलेले सर्वजण आवर्जून या उत्सवासाठी येतात.

आयोजकांनी सर्व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# पारनेरच्या वीज प्रश्नावर मुंबईत उच्चस्तरीय बैठक : आ. दाते

## धोत्रे येथे २२० केवी उपकेंद्राला गती:बाभूळवाडा ट्रांसफार्मरची क्षमता वाढीचे तातडीचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेरच्या वीज प्रश्नांवर मुंबईत उच्चस्तरीय बैठक पारनेर तालुक्यातील वाढत्या वीज समस्यांबाबत आ. काशिनाथ दाते सरांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी महापारेषण संचालक सतीश चव्हाण, कार्यकारी संचालक धनंजय औडेकर, अधिक्षक अभियंता प्लॉनिंग दाभरडे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण उपस्थित होते. बैठकीत पारनेर तालुक्यातील कमी दाबाचा वीजपुरवठा, लांब पल्ल्याच्या ३३ के.व्ही. वाहिन्या, अपुरी ट्रान्सफॉर्मर क्षमता तसेच नवीन उपकेंद्र उभारणी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

> धोत्रे येथे मंजूर असलेल्या नवीन २२० के.व्ही. उपकेंद्र तातडीने उभारणीची आवश्यकता आहे, हे उपकेंद्र लवकरात लवकर कार्यान्वित झाल्यास प्रत्येक ३३/११ के.व्ही. उपकेंद्राला स्वतंत्र वाहिनीद्वारे वीजपुरवठा करणे शक्य होणार असून कमी दाब, वारंवार खंडित होणारा पुरवठा व तांत्रिक बिघाडाच्या समस्यांपासून मोठा दिलासा मिळणार असल्याचे ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचे निर्दर्शनास आणून दिल्याने मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना धोत्रे येथील प्रस्तावित उपकेंद्राचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक बदल करून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहे.
>
> **आ. काशिनाथ दाते सर**
> **(विधानसभा सदस्य)**

पारनेर तालुक्यात सध्या सुपा व बाभुळवाडा येथे १३२ के. व्ही. उपकेंद्र असून, केडगाव (जि. अहिल्यानगर), शिरूर व आळेफाटा (जि. पुणे) येथूनही विविध ३३/११ के. व्ही. उपकेंद्रांना वीजपुरवठा केला जात आहे. मात्र अनेक वाहिन्यांची लांबी ४० ते ५० किलोमीटरपर्यंत असल्याने कमी दाबाने वीजपुरवठा, वारंवार तांत्रिक बिघाड आणि दुरुस्तीसाठी होणारा विलंब यामुळे ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे आ. दाते यांच्या माध्यमातून बैठकीत निर्दर्शनास आणून देण्यात आले.

आळेफाटा येथून येणाऱ्या ३३ के.व्ही. वाहिनीवर अळकुटी, आणे, पळसपूर व वारणवाडी अशी चार उपकेंद्रे जोडलेली असून या वाहिनीची लांबी तब्बल ५० कि.मी. आहे. तसेच बाभुळवाडा येथून निघणाऱ्या सहा वाहिन्यांवर कान्हूर पठार, टाकळी ढोकेश्वर व निघोज परिसरातील प्रत्येकी दोन उपकेंद्रे जोडलेली आहेत. केडगाव येथून येणाऱ्या वाहिनीवर भाळवणी, गोरेगाव व ढवळपुरी ही उपकेंद्रे जोडलेली असून वाहिन्यांचे अंतर जास्त असल्याने वारंवार अडचणी निर्माण होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.




वडगाव सावताळ - वनकुटे परिसरातील नवीन सबस्टेशनच्या मागणीबाबतही सकारात्मक चर्चा झाली. संबंधित प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना देत त्यावर लवकरच कार्यवाही केली जाईल, असा विश्वास मंत्री बोर्डीकर यांनी व्यक्त केला तर खडकवाडी व अळकुटी येथे नवीन सेक्शनच्या मागणीवर ग्राहकसंख्येचा आढावा घेऊन निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

दरम्यान, बाभुळवाडा येथील १३२ के.व्ही. उपकेंद्रात सध्या कार्यरत असलेल्या २५ चत-क्षमतेच्या दोन पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवून प्रत्येकी ५० चत- करण्यास मंजुरी मिळालेली असून त्याची अंमलबजावणी रखडल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले. यावर मंत्री बोर्डीकर यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

तसेच ठऊ्डड योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईवरही नाराजी व्यक्त करत संबंधित ठेकेदारांना कामे जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले असून या बैठकीमुळे पारनेर तालुक्यातील दीर्घकालीन वीज समस्यांच्या निराकरणाला गती मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.१५ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## खंडाळ्यात तिसरा बिबट्या जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील खंडाळा येथील शेळके वस्ती नजीक आठ दिवसात तिसरा बिबट्या जेरबंद करण्यात स्थानिक नागरिकांसह वनविभागाच्या अधिकाऱ्यांना यश आले आहेत.स्थानिक परिसरात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती अखेर काही प्रमाणात तरी, कमी झाली. वनविभागाच्या पथकाने आठ दिवसांच्या कालावधीत तिसऱ्या नर बिबट्याला यशस्वीरित्या जेरबंद केले. या परिसरात वारंवार बिबट्याचे दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. लोड शेडिंग व रात्रीची येणारी लाईट यामुळे शेतात पाणी भरण्यासाठी जाण्याचे काम जिकरीचे झाले आहे. मात्र महिला मजूर काम करण्यास धवाजत नाही. या परिसरात अजूनही दोन ते तीन बिबटे असल्याचे अंदाज येथील स्थानिक शेतकरी करत आहेत.वनविभागाच्या या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, पकडलेल्या बिबट्याला राहुरी विद्यापीठ येथे घेऊन जाणार असल्याची माहिती वनधिकाऱ्यांनी दिली.सदरचे परिसरातील पकडलेले बिबटे हे जवळपास अंतरावर जाऊन वनविभागाचे अधिकारी सोडून देतात असा,आरोप येथील स्थानिक नागरिक करित आहेत.तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहावे, व बिबट्या दिसल्यास त्वरित वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहेत.या बिबट्या जेरबंद करण्यासाठी शेखर ढोकचौळे, विजय ढोकचौळे, प्रकाश अभंग, संतोष पिनाटे,किरण टेकाळे, महेश ढोकचौळे, गणेश माळी, सचिन शेळके, आदींनी मदत केली.

# निसर्गाचा तांडव! संगमनेर तालुक्यात अवकाळीचा कहर

### वीज कोसळून एकाचा मृत्यू; फळबागा, घरे आणि शेतीचे कोट्यवधींचे नुकसान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी वार्ताहर** : संगमनेर तालुकाच्या पूर्व भागाला बुधवारी (१३ मे) सायंकाळी निसर्गाच्या भीषण कोपाचा सामना करावा लागला. अचानक आलेल्या मान्सूनपूर्व वादळी पावसाने आणि विजांच्या कडकडाटाने परिसरात हाहाकार माजवला. या नैसर्गिक आपत्तीत डिग्रस येथील ६४ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला असून, शेकडो हेक्टरवरील पिके आणि फळबागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाल्याने नागरिक उघड्यावर पडले आहेत.

**वीज कोसळून वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू**

डिग्रस येथील सानपत्री वस्तीवर राहणारे महादू दगडू माळी (वय ६४) हे सायंकाळी साडेचारच्या सुमारास घरात असताना अचानक वादळी वाऱ्यासह वीज कोसळून त्यांचे घर कोसळले. या दुर्घटनेत ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पत्नी घराबाहेरील पडवीत असल्याने त्या सुदैवाने बचावल्या. मृतदेह शवविच्छेदनासाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.



**लिंबू बागा मुळासकट उखडल्या**

पिंप्री लौकी आणि अजमपूर भागात वादळाचा वेग प्रचंड होता. अनेक शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षे जपलेल्या लिंबू बागा क्षणात उद्ध्वस्त झाल्या. ज्ञानदेव गंगाधर गीते यांच्या शेतातील १०० लिंबाची झाडे मुळासकट उपटून पडली. काढणीला आलेला कांदा, मका आणि चारा पिकांचेही मोठे नुकसान झाले. सामाजिक कार्यकर्ते भारत पाटील गीते यांनी नुकसानीची पाहणी करून राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे तातडीने पंचनामे करून भरपाई देण्याची मागणी केली आहे.

**घरांचे पत्रे उडाले, झाडे कोसळली**

शिबलापूर येथील माळेवाडी रस्त्यावर गणपत नागरे यांच्या वस्तीवरील ६० वर्षांपूर्वीचे लिंबाचे झाड विहिरीत कोसळले. यामुळे विहिरीतील दोन इलेक्ट्रिक मोटारींचे नुकसान झाले. तसेच आठ आंब्याची झाडे उखडली, तर १०० कोंबड्यांचे खुराडे उडाल्याने मोठे नुकसान झाले. शेडगाव येथे सहा घरांवरील पत्रे उडाल्याने सहा कुटुंबे उघड्यावर पडली आहेत.

**आश्रमाचे पत्रे उडाले, वीज पुरवठा खंडित**

अंभोरे येथील श्री दत्त पावन आश्रम येथील भक्तनिवासाचे पत्रे वाऱ्यामुळे दूरवर फेकले गेले. सुदैवाने येथे कोणतीही जीवितहानी झाली नाही. आश्वी स्टेशन परिसरातील मुख्य विद्युत वाहिनीचे पोल कोसळल्याने अनेक गावांचा वीज पुरवठा बुधवारपासून खंडित झाला आहे. तो पूर्ववत होण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

**प्रशासनाकडे मदतीची आर्त हाक**

जाखुरी-कोळवाडे रस्त्यावर झाडे पडल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. तसेच अनेक शेतकऱ्यांचे गोठे उद्ध्वस्त झाले असून केळी, आंबा, डाळिंब आणि टोमॅटो उत्पादक शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. तहसीलदार व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामे करून ओला दुष्काळ सदृश परिस्थिती लक्षात घेता नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. लवकरच एक शिष्टमंडळ पालकमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे भारत पाटील गीते यांनी सांगितले.

## पंतप्रधानांच्या इंधन बचतीच्या संदेशानंतर

### डॉ. विखे पाटलांनी शासकीय ताफ्यात केली कपात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : देशभरात इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि अनावश्यक शासकीय खर्च कमी करण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या संदेशाची व्यापक चर्चा सुरू असतानाच अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष कृतीतून त्याला प्रतिसाद दिला आहे. शासकीय ताफ्यातील अनावश्यक वाहनांची संख्या कमी करत त्यांनी आता आपल्या ताफ्यात केवळ दोनच वाहने ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पालकमंत्री विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून, सामान्य जनतेतूनही या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी स्वतःपासून काटकसरीची सुरुवात करावी, असा संदेश या निर्णयातून दिला जात असल्याचे बोलले जात आहे.

सध्या देशभरात इंधन वापर कमी करणे, पर्यावरण संवर्धन आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यावर भर दिला जात आहे. अशा परिस्थितीत मोठे ताफे, अतिरिक्त वाहनांचा वापर आणि वाढता शासकीय खर्च यावर अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. त्याच पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांनी घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. विशेष म्हणजे, अनेकदा राजकीय पदाधिकाऱ्यांचे मोठे ताफे, त्यासाठी लागणारा इंधन खर्च आणि प्रशासनावर येणारा अतिरिक्त भार याबाबत सामान्य नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असते. मात्र विखे पाटील यांनी स्वतःहून पुढाकार घेत ताफ्यात कपात केल्याने साधेपणा आणि जबाबदारीचे उदाहरण समोर आले आहे. पर्यावरणपूरक जीवनशैली, इंधन बचत आणि सार्वजनिक पैशांचा योग्य वापर या तिन्ही गोष्टींचा समतोल साधण्याचा प्रयत्न या निर्णयातून दिसून येत आहे.

लोकप्रतिनिधींनी जनतेला फक्त संदेश देऊन चालत नाही, तर स्वतः कृतीतून आदर्श निर्माण करणेही गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पालकमंत्री विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे राज्यातील इतर लोकप्रतिनिधी आणि शासकीय यंत्रणांनीही अशा प्रकारे खर्चात बचत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे. इंधन बचतीसह पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा हा निर्णय सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

## प्रवरा कॅनॉलमध्ये अनोळखी मृतदेह आढळला

### अकस्मात मृत्यूची नोंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव रोड परिसरातील शिरसगाव व वडाळा महादेव शिवेवरील प्रवरा कॅनॉलमध्ये एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती स्थानिक नागरिकांनी श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे दिल्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी साखर कामगार रुग्णालय येथे पाठविला.

वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती गुरुवारी (दि. १४ मे २०२६) संबंधित इसमाचा कॅनॉलच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे घोषित केले. रुग्णालयाच्या 'डेड मेमो' (क्र. १५६८/२०२६) नुसार श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. नोंद क्रमांक ६६/२०२६ अशी असून इछडड कलम १९४ नुसार प्रक्रिया करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक किरण टेकाळे करीत आहेत. मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नसून, संबंधित व्यक्तीबाबत माहिती असल्यास किंवा कोणी बेपत्ता असल्यास श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## नाशिक-संगमनेर मार्गावरील इंधन पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा!

### मोदींच्या इशारानंतर इंधनाचा तुटवडा...

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर खुर्द** : गेल्या दोन दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यपूर्वेतील तणाव कायम राहिला तर पेट्रोल-डिझेलच्या किमतीत तब्बल २५ ते २८ रुपये प्रतिलिटर वाढ होऊ शकते.

त्यामुळे नागरिकांनी इंधनाची बचत करावी, विजेचा वापर कमी करावा आणि देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले होते. त्याचाच परिणाम आज, दि. १४ मे रोजी नाशिक ते संगमनेर मार्गावर पाहायला मिळत आहे. अनेक इंधन पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून आले असून काही ठिकाणी पेट्रोल-डिझेल शिल्लक नाही असे फलक लावण्यात आले आहेत. त्यामुळे वाहनचालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर दैनिक समर्थ गावकरी समूहाचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनीही आपल्या विशेष लेखांमधून इशारा दिला असून, लवकरच नागरिकांना पेट्रोल-डिझेल दरवाढीचा मोठा फटका बसू शकतो. पेट्रोल-डिझेलच्या किमतीत २५ ते ३० रुपयांपर्यंत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे मत व्यक्त केले आहे. दैनिक लोकमतचे संगमनेर येथील प्रतिनिधी संजय गोपाळे यांनी सांगितले की, सध्या देशात इंधन टंचाईची परिस्थिती जाणवत असून त्याचाच परिणाम इंधन पंपांवर दिसून येत आहे.

इंधन पंप चालक जाणीवपूर्वक साठेबाजी करत आहेत असे वाटत नाही; मात्र वरूनच पेट्रोल-डिझेलचा पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने ग्राहकांना त्याचा फटका बसत आहे.

दरम्यान, आगामी काळात इंधनाच्या दरामध्ये २५ ते ३० रुपयांपर्यंत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून त्यामुळे सर्वसामान्य नागरिक, वाहनचालक आणि वाहतूक व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## ६५ वर्षीय मातेच्या समयसूचकतेमुळे वाचला मुलाचा जीव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आश्वी / झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील पठार भागातील खरशिंदे गावात गुरुवारी सकाळी एका बिबट्याने शिरकाव केल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली. मात्र, वाडेकरांच्या दगडी वाड्यातील घरामध्ये बिबट्या शिरलेला असताना एका ६५ वर्षीय मातेने दाखवलेल्या अचाट धैर्यामुळे आणि समयसूचकतेमुळे तिच्या मुलाचा जीव थोडक्यात वाचला आहे. वनविभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत या बिबट्याला गुंगीचे इंजेक्शन देऊन जेरबंद केले. मिळालेल्या माहितीनुसार, खरशिंदे गावातील हरिभाऊ शिवराम गायकवाड यांच्या घरात सकाळी ७ वाजेच्या सुमारास बिबट्याने अचानक प्रवेश केला.



त्यावेळी हरिभाऊंची आई गंगुबाई (वय ६५) या दरवाजाजवळ असलेल्या चुलीवर स्वयंपाक करत होत्या. त्याच वेळी दोन फुटाच्या अंतरावरुन बिबट्या अचानक घरात शिरला. बिबट्या घरात शिरला त्यावेळी हरिभाऊ गायकवाड हे दरवाजाच्या अगदी शेजारीच झोपलेले होते. समोर साक्षात काळ उभा असल्याचे पाहूनही गंगुबाई डगमगल्या नाहीत. क्षणाचाही विलंब न लावता गंगुबाई यांनी आरडाओरडा करत मुलगा हरिभाऊ याला बिछान्यासकट बाहेर ओढले आणि अत्यंत शिताफीने घराच्या दरवाजाची कडी बाहेरून लावून घेतली. आईच्या या समयसूचकतेमुळे बिबट्या घरातच कैद झाला आणि पुढील मोठा अनर्थ टळला. या घटनेची माहिती मिळताच वन परिक्षेत्र अधिकारी सुभाष सांगळे , वन मंडल अधिकारी भाऊसाहेब बोकडे , वनरक्षक रामेश्वर मडपे , रेस्क्यु टीम प्रमुख संतोष पारखे , वनरक्षक पवार , धानापुणे , साळवे , कर्मचारी पोपट गागरे , नजीर शेख , उत्तम भूसारी , गोविंद भूसारी , संजय गागरे , रामदास वर्पे यांनी पथकासह तातडीने गायकवाड यांच्या घरी धाव घेतली. बिबट्या घरात लपून बसलेला होता.

त्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाला मोठ्या कसरती कराव्या लागल्या. बिबट्याला बेशुद्ध करण्याचे इंजेक्शन देण्यासाठी जवळपास अर्धा तास लागला. या दरम्यान बिबट्या घरामध्ये इकडून तिकडे उड्या मारत लपंडाव खेळत होता. अखेर इंजेक्शनचा प्रभाव पडल्यानंतर बिबट्याला सुरक्षितपणे जेरबंद करण्यात आले. हा थरार सुरू असताना गावातील तरुणांनी आणि ग्रामस्थांनी वनविभागाला मोलाची मदत केली. यामध्ये संजय गायकवाड, निलेश वाडेकर, मोशीन शेख, रामनाथ वाडेकर, शिवा पंडित, जब्बर शेख, दत्ता पवार, दीपक कोळशे, शाहरुख सय्यद, लहानु पंडित, संजय पंडित, गोरख जगधने, पिर मोहम्मद शेख, संजय भुसारी, मोसिन शेख आणि सोनू पंडित या सर्वांनी घटनास्थळी धाव घेत बचाव कार्यात सहकार्य केले.

बिबट्या जेरबंद झाल्याने खरशिंदे गावासह पठार भागातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. मात्र, परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने वनविभागाने गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## देश हितासाठी नरेंद्र मोदीचा निर्णय योग्यच

### अनुसूचितला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण द्या : ना. आठवले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील संपत्ती वाचवण्यासाठी बचतीसाठी अनेक निर्णय घेतले. सर्वांनी त्यास अनुकरण करणे गरजेचे आहे. तसेच मागासवर्गीय उपवगीकरणांमध्ये जातीय लोकसंख्येच्या आधारावर आरक्षण द्यावे. असे मत केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री ना रामदास आठवले यांनी शिर्डी येथे व्यक्त केले. ते काल अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांची उपस्थितीत राहुरी तालुक्यातील कणगर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याआधी ते शिर्डी येथील शासकीय विश्रामगृहावर पत्रकाराची संवाद साधला यावेळी ते बोलत होते.

यावेळी ना आठवले म्हणाले की, माझी भूमिका ही रिपब्लिकन ऐक्याची असून प्रकाश आंबेडकर यांना आम्ही वेळोवेळी ऐक्यात सामील होण्यासाठी प्रयत्न केले आहेत परंतु ते त्या समर्थन देत नाही त्यामुळे आम्ही छोट्या मोठ्या गटांना घेऊन रिपाई मध्ये करण्याचे आवाहन केले आहे अनेक गट संपून रिपब्लिकन पक्षात अनेक जण सामील होत आहे रिपाई देशात संपूर्ण देशात पसरलेला पक्ष आहे त्यामुळे मला केंद्रात मंत्री होण्याची संधी मिळाली दोन राज्यात पक्षाला मान्यता मिळाली असून आहे. संसदेत महिलांसाठी आरक्षण आणले होते विरोधी पक्ष महिला आरक्षणाला विरोध करणार नाही अशी आमची अपेक्षा होती परंतु राहुल गांधी व विरोधकांनी या बिलाला विरोध केला या कोपरगाव मतदारसंघात खासदार बाळासाहेब विखे असताना येथे आरक्षण पडले या प्रक्रियेला विखे यांना सुद्धा काही करता आले नाही ज्या ठिकाणी एस सी समाजाची संख्या जास्त होती तेथे मतदारसंघ आरक्षित झाले. महिलांना आरक्षण पाहिजे असल्यास महिलांनी २०२९ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष व मित्र पक्षांना भरभरून मतदान केले पाहिजे नरेंद्र मोदी पेट्रोल डिझेलची बचत करण्याचे आवाहन करत आहे आपल्या देशाची इकॉनोमी स्ट्राँग आहे.



आज जगात भारताचा चार नंबर असून तीन नंबर येण्याकडे आपली वाटचाल सुरू आहे देश हितासाठी नरेंद्र मोदींचा निर्णय योग्य असून त्यांच्या निर्णयाला पाठिंबा म्हणून आपण सर्वांनी त्यांचे अनुकरण करणे गरजेचे आहे. मोदी यांनी आव्हान केल्याप्रमाणे गाड्या कमी वापरा पेट्रोल डिझेलचा वापर कमी करा सोने खरेदी करण्याऐवजी उद्योगात गुंतवा परदेश दौरे टाळा यासाठी देशांतर्गत तीर्थस्थानांना भेटी देणे गरजेचे आहे अर्थतज्ज्ञांनी मार्गदर्शन करून रुपयाचा स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. मागासवर्गीय उपवर्गीकरणाच्या आरक्षणाबाबत ते म्हणाले, चंद्रबाबू नायडूंनी मुख्यमंत्री असताना मादी आणि मदिगा हा प्रश्न उभा राहिला होता अशा जातींना सुप्रीम कोर्टाने आपले मत व्यक्त केले होते ज्या राज्यांना उपवरगीकरण करायचे असेल प्रत्येक जातीच्या लोकसंख्येनुसार त्यांना रिझर्वेशन देणे गरजेचे आहे .एस सी मधल्या सगळ्या जातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात रिझर्वेशन द्यावे अशी मागणी यावेळी केली. मागासवर्गीयांच्या महामंडळाची कर्ज ८०० ते ९०० कोटी रुपये असून ते माफ करावे अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे करणार आहोत.

मेड इन इंडिया या व्हिजनसाठी त्याचा फायदा तरुणांनी उचलला पाहिजे दलित तरुणांनी उद्योगात उतरले पाहिजे मराठा समाजाच्या तरुणांनी उद्योग क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे सर्व समाजाला एकत्र आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे स्वतःच्या बळावर जागा निवडून आणण्यासाठी आमचा पक्ष प्रयत्नशील असून आहे. पुण्यातील भोसरी येथील रिपब्लिकन पक्षाच्या कामगार आघाडीच्या कार्यकर्त्यावर जो हल्ला झाला त्या हल्लयाची चौकशी करण्याची मागणी आम्ही केली आहे देशात मतदारांनी शंभर टक्के मतदान करण्याची गरज असून १०० टके मतदान होण्यासाठी कायदे करण्याची गरज आहे प्रत्येकाने मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे असे ते म्हणाले. यावेळी त्यांचे समवेत राष्ट्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खंबाळकर, जिल्हा संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव, रिपाईचे राज्य उपाध्यक्ष विजयराव वाकचौरे, जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, युवक जिल्हाध्यक्ष पप्पू बनसोडे, राजाभाऊ कापसे, कैलास शेजवळ, चांगदेव जगताप, राहाता तालुका अध्यक्ष धनंजय निकाळे, दिपक गायकवाड, सुनिल साळवे, अनिल नन्नावरे उपास्थित होते.

# पाणीप्रश्न पेटला; ग्रामपंचायत कार्यालयाला महिलांनी ठोकले टाळे

### ग्रामपंचायतचे ४ सदस्य उपस्थित

राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील राहुरी खुर्द येथे तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावरून ग्रामस्थांचा संताप अनावर झाला असून संतप्त महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकून जोरदार आंदोलन छेडले. गेल्या अनेक दिवसांपासून गावात पाणीपुरवठा वेळेवर होत नसल्याने नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

ऐन उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना भटकंती करावी लागत असल्याने अखेर महिलांनी ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली. महिलांनी सांगितले की, आम्ही नियमितपणे व वेळेवर पाणीपट्टी भरत आहोत. मात्र तरीही नागरिकांना पुरेसा व नियमित पाणीपुरवठा मिळत नाही. अनेकदा दोन-दोन दिवस नळाला पाणी येत नाही. पाण्यासाठी रात्रभर जागरण करावे लागत आहे. यामुळे महिलांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीकडून १४ गाव पाणीपुरवठा योजनेची पाण्याची टाकी पूर्ण क्षमतेने भरत नसल्यामुळे गावाला कमी दाबाने पाणीपुरवठा होत नाही, असे कारण सांगण्यात आले. मात्र ग्रामस्थांनी हे कारण मान्य करण्यास नकार देत प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

आंदोलनावेळी १४ गाव पाणीपुरवठा योजना सदस्य शिवाजी शेंडे, शौकत इनामदार, ग्रामविकास अधिकारी प्रभाकर चव्हाण,आयुब पठाण व ग्रामपंचायत सदस्य राम तोडमल, आश्विनी कुमावत, असफ पठाण आदी उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थ महिलांनी प्रशासनाला धारेवर धरत पाणीप्रश्न तात्काळ सोडविण्याची मागणी केली. या आंदोलनात जयश्री गाडे, मनिषा



कारंजकर, स्वाती पवार, कविता पेंडभाजे, चंद्रकला खोजे, वैशाली क्षिरसागर, माया क्षिरसागर, शम्मू शेख, छाया मेहेत्रे, हेमा लालबागे, अर्पणा पवार, सुनंदा मोरे, मंगला कोरके, अनिता डोंगरे, नंदिनी डफळ, मंगला सांगळे, पूजा जाधव, सारिका वाकचौरे, रंजना दातीर, उमा मेहेत्रे, हौसाबाई चांदणे, सकुबाई चांदणे यांच्यासह मोठ्या संख्येने

> जोपर्यंत गावातील पाणीपुरवठा सुरळीत होत नाही, तोपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयाचे कुलूप उघडू देणार नाही, असा इशारा आंदोलनकर्त्या महिलांनी दिला. ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच उपस्थित नसल्याने महिलांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच ग्रामपंचायत सदस्यही कार्यालयात अनुपस्थित असल्यामुळे ग्रामस्थांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

महिला सहभागी झाल्या होत्या.

तसेच निसारभाई शेख, पुंजा आघाव, लखन डोकडे, अन्सार पठाण, राजेंद्र खोजे, रफिक शेख, अशोक वाकचौरे, रंगनाथ चोपडे, संजय थोरात, जगन्नाथ भोसले, मनोहर गायकवाड, अनिल आढाव, राजेंद्र थोरात, योगेश गरड, अशोक जाधव, सकलेन शेख, फारूक सय्यद, रामनाथ डोके, बाबा आढागळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावातील वाढत्या पाणीटंचाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.